# प्राजक्त

वर्ष: ४० अंक : ९४ कोल्हापूर ता. १३ जानेवारी २०१३
Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur

# आम्ही भिडे

जानेवारी २०१३ अंक १४ वा, वार्षिक




२९ डिसेंबर २०११ रोजी झालेल्या भिडे संमेलनाचे प्रमुख अतिथी मेजर जनरल श्री. संजय वामन भिडे यांचे हस्ते पुरस्कार स्वीकारताना १) श्री. नीलकंठ लक्ष्मण ऊर्फ अण्णा भिडे २) सौ. वसुधा विद्याधर भिडे ३) श्री. विक्रम भिडे, ४) 'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन ५) विद्यार्थी गुणगौरव शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी ६) मनोरंजन कार्यक्रमातील सौ. वीणा केळकर(भिडे) यांच्या मंडळातील गायक व वादक कलाकार ७) डॉ. वसुधा भिडे लिखित 'चित्पावन आणि चित्पावनी' या पुस्तकाचे प्रकाशन ८) सौ. मिताली भिडे रत्नागिरी यांचे विद्यार्थिनींसह झालेले भरतनाट्यम् ९) संमेलनास उपस्थित भिडे कुटुंबीय

**The leading Event Management Company**

for last 11 years

Medical Events

Corporate Events

Industrial Events

Exhibitions

Birthday Parties

Outdoor Catering

# ASCENT Hospitality Pvt. Ltd.

14/B7, Vrundavan Housing Complex,
Third Floor, Sector B,
52/28 AB, Kothrud, Opp Guruganesh Nagar,
Pune - 411038.

Tel : 020 2538 0406 Fax : 020 2538 0407

Cell : 09860404990


Email : ajit@ascenthospitality.in

Directors : Ajit Bhide & Aishwarya Bhide

|| श्री व्याडेश्वर प्रसन्न ||



## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान



नित्युंदन ऋषी

आम्ही भिडे अंक १४ वा

**संपादक :** श्री. शशिकुमार केशव भिडे

**कार्यकारी संपादक :** श्री. दिलीप भिडे

**संपादक मंडळ :** श्री. प्रभाकर भिडे, ले. क. सुनील भिडे (नि.), श्री. विद्याकर भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. श. ह. भिडे. श्री. विलास भिडे, सौ. प्रिया भिडे,

**सल्लागार मंडळ :**
सुनील भिडे (अभिरुची), शशिताई घुले, पुरुषोत्तम भिडे, पूर्णचंद्र भिडे

**अक्षर जुळणी आणि मुद्रण :**
विनायक वि. भिडे (पुणे)

साप्ताहिक प्राजक्त

# आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय 'भिडे प्रतिष्ठान'
मुखपत्र (खाजगी वितरण)

अंक चौदावा (वार्षिक) जानेवारी २०१३

**भिडे प्रतिष्ठान** - संस्था नोंदणी क्र. ई - २०१४०(मुंबई)

**पुणे कार्यालय :** ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, **पुणे** - ४११ ००२. **दूरध्वनी :** ९६५७५४१२३६, किंवा ९८२२०२४८४९

**ठाणे कार्यालय :** शिवानंद सोसायटी(बेसमेंट), घुळे पार्क, टाइम्स् ऑफ इंडिया ऑफिसचे खाली, एम्. जी. रोड, नौपाडा, ठाणे (प) ४०० ६०२.

**दूरध्वनी** - ९९३०५०८५०६ किंवा ९८९२५६३१५४

e-mail - office@bhidekul.in website:www.bhidekul.in

## संपादकीय

भिडे प्रतिष्ठान स्थापन होऊन एक तप होऊन गेले. गेल्या १२ ते १३ वर्षात आपण अनेक उपक्रम केले. वर्षातून दर ३ महिन्यांनी 'आम्ही भिडे' च्या माध्यमातून आपण एकमेकांशी संवाद साधतो आहोत. तसेच वाढदिवसाची शुभेच्छापत्रे वेबसाईटवर नोंद केलेल्या प्रत्येक भिडे कुलोत्पन्नास पाठवीत आहोत. 'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन असो किंवा संमेलन असो, आपण वेगवेगळ्या गावामध्ये जाऊन प्रकाशन व संमेलन साजरे करतो. हे फक्त आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच शक्य होत आहे. वेगवेगळ्या गावी असे कार्यक्रम घेऊन गावातील परिचित किंवा अपरिचित भिडे मंडळींना एकत्र आणल्यामुळे एकमेकांचे विचार व नवीन उपक्रम होण्यासाठी मदत होते. त्याचेच एक फलित म्हणजे सातार्‍यातील होणारे आगामी संमेलन आहे. सातार्‍यामध्ये भिडे मंडळी बरीच आहेत परंतू सर्वच भिडे एकमेकांना ओळखतातच असे नाही. परंतू या संमेलनाचे निमित्ताने आजमितीला किमान ४० ते ५० भिडे बंधु/भगिनी व माहेरवाशिणी दर १५ दिवसांनी एकत्र येत आहेत. ही बाब प्रशंसनीय आहे.

संमेलन म्हटले की स्थानिक मंडळींचा सहभाग महत्वाचा असतो. त्यादृष्टीने सातारकर भिडे मंडळींना प्रतिष्ठानने आत्मविश्वास दिला. सातार्‍यातील सर्वच भिडे महिला व पुरुषांचा अमाप उत्साह बघून हे संमेलन भव्य प्रमाणात साजरे होईल यात शंकाच नाही. १९९९ साली प्रतिष्ठानचे रोप लावले, बघता बघता १२ वर्षात वृक्ष तयार झाला. हा वृक्ष मोठा करण्याकरिता अनेक मंडळींनी हातभार लावला. त्यापैकी डोंबिवलीचे कै. दामोदर उर्फ दामूकाका व पनवेलचे ॲड. कै. विश्वासराव या व्यक्ती आता आपल्यात नाहीत ही बाब मनाला दुःख देऊन जाते. अशी माणसे संस्था मोठी करण्याकरिता झपाटल्यासारखे काम करून आपले आयुष्य झोकून देतात म्हणून संस्था मोठ्या होतात. भिडे प्रतिष्ठानच्या 'आम्ही भिडे' अंका करिता संपादन, डी.टी.पी. किंवा वेबसाईट, अकाउंटस् ॲडमिनिस्ट्रेशन इत्यादी कामामध्ये दर दिवशी नाही परंतु मदत करण्याकरिता तरुण वर्गाने आवर्जून पुढे यावे. तसेच प्रतिष्ठानचे संमेलन किंवा अन्य कार्यक्रमामध्ये तरुण आणि महिला वर्गाचा सक्रिय सहभाग वाढविण्याकरिता येणाऱ्या सूचनांचे स्वागतच होईल. आपल्या भिडे कुलोत्पन्नांपैकी अनेक जण लेखन, काव्य करतात, खेळाडू किंवा निरनिराळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींची माहिती आमचेपर्यंत पोहचविण्याकरिता आम्ही भिडे अंक व वेबसाईटचा वापर जरूर करावा.

जाहिरातीच्या उत्पन्नातून 'आम्ही भिडे'चे सर्व अंक विनामूल्य वितरित करीत आहोत. म्हणून सर्व जाहिरातदारांना मी विनम्रपणे नमस्कार करून इथे थांबतो

**कार्यकारी संपादक**

**सर्व जाहिरातदार, बॅनर्स, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा**

**भिडे कुलातील ज्या व्यक्तींचा नुकताच स्वर्गवास झाला अशा सर्व मृतात्म्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे आणि त्या सर्वांना सद्‌गती प्राप्त होवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना !**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**
पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे - ४११ ००२
फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

**• पत्रव्यवहारासाठी पत्ता •**
**विनायक वि. भिडे**
**५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ,**
**भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.**
**फोन - २४४५३२७४ मोबा : ९५५२२१६९६७**

# अनुक्रमणिका

१) संपादकीय - - - - - - - - - - - - - - - - - - - - १
२) भिडे प्रतिष्ठानची नवी कार्यकारिणी - - - - - - - - ४
३) भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! - ९
४) पुतळ्यांचे सम्मेलन - - - - - - - - - - - - - - ९
५) पुनर्जन्म - - - - - - - - - - - - - - - - - - - १३
६) स्व. दामोदर केशव भिडे आदरांजली - - - - - - १७
७) हृद्य आठवणी - - - - - - - - - - - - - - - - २१
८) कै. न. ना. भिडे यांची जन्मशताब्दी - - - - - - - २७
९) कविता - - - - - - - - - - - - - - - - - - - २९
१०) शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा - - - - - - - - - ३१
११) पारंपारिक मंगळागौरीचे खेळ - - - - - - - - - - ३३
१२) देशभक्त शंकर विष्णू तु बापूराव भिडे - - - - - ३५
१३) जावेपूर्वकडील देशा - - - - - - - - - - - - ३७
१४) उगवत्या सूर्याच्या देशातील भारतीय जादूगार - - ३८
१५) दिवाळी अंकाच्या निमित्ताने - - - - - - - - - - ४०
१६) 'आम्ही भिडे' अंक १३ चा प्रकाशन समारंभ - - ४२
१७) ऑक्टोबर ते डिसेंबर २०१२ - देणगीदारांची यादी ४२
१८) राजस स्नेह - - - - - - - - - - - - - - - - ४३
१९) विद्यार्थी गुणगौरव योजना २०१२-१३ - - - - - ४५
२०) ऋषितुल्य - - - - - - - - - - - - - - - - - ४६

## विनम्र आवाहन

आम्ही भिडे च्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधीत आहोत. आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना आपल्या सहकार्याची जोड अपेक्षित आहे. 'आम्ही भिडे' मुखपत्रासाठी छोटे माहितीपूर्ण लेख, कविता, उल्लेखनीय कार्य, पुरस्कार,सन्मान, कुटुंबातील जन्म-मृत्यू इ. बाबत माहिती प्रतिष्ठानच्या ठाणे/पुणे कार्यालयात पाठवावी. हा अंक शक्यतो जाहिरातीवरच अवलंबून असल्यामुळे आपण करीत असलेल्या उद्योग/व्यवसायाची जाहिरात प्रसिद्धीसाठी द्यावी (जाहिरात दर अंकात दिलेले आहेत.) संपर्कासाठी बदललेले व अचूक पत्ते, इ-मेल, तसेच आपल्या परदेशस्थ नातेवाइकांचे इ-मेल्स/पत्ते पाठवावेत. भिडे माहेरवाशिणींनी पत्ते आवर्जून पाठवावेत. 'आम्ही भिडे' अंकाचे वितरण विनामूल्य आहे,तरी सुद्धा जाहिरात आणि देणगीच्या स्वरूपातआर्थिक हातभार लावावा.

# भिडे प्रतिष्ठान कार्यकारिणी

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची सभा दि. १५ सप्टेंबर २०१२ रोजी तळेगांव दाभाडे, पुणे येथे श्री. चंद्रकांत भिडे यांच्या निवासस्थानी झाली.

सर्वप्रथम प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य आणि प्रतिष्ठानच्या कामामध्ये सक्रीय सहभाग असणारे श्री. दामोदर केशव ऊर्फ दामूकाका भिडे व सूर्यशिबीर, पुणे चे संस्थापक श्री. नीलकंठ लक्ष्मण ऊर्फ अण्णा भिडे आणि अन्य ज्ञात-अज्ञात दिवंगत भिडे मंडळींना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठानचे लेखापरीक्षक श्री. विजयराव भिडे यांनी वार्षिक ताळेबंद कार्यकारिणीपुढे मांडला, त्याबाबत चर्चा व विचारविनिमय झाला. आगामी कुलसंमेलन, आम्ही भिडे अंक, वेबसाईट, संचित निधी इत्यादी विषयांवर चर्चा करून निर्णय व जबाबदारीचे नियोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे या सभेमध्ये कार्यकारिणीचा विस्तार करून काही बदल सर्वानुमते संमत करण्यात आले आणि १४ ऑक्टोबर २०१२ रोजी ठाणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये खालील कार्यकारिणी जाहीर करून त्याला सर्वानुमते मान्यता घेण्यात आली. कार्यकारिणीमध्ये झालेले बदल खालीलप्रमाणे आहेत -




**१) अध्यक्ष - श्री. माधव चिं. भिडे.** (मुंबई) - वय ८० वर्षे

९ ऑक्टोबर २०११ पासून भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष. ब्रिजवाले भिडे म्हणून ओळखले जातात. भारतीय रेल्वेमधील नोकरीतून निवृत्त झाल्यावर उद्योजकांसाठी **'सॅटर्डे क्लब'** ची स्थापना केली. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य व विश्वस्त. भिडे प्रतिष्ठानची उभारणी करण्यामध्ये मोठा सहभाग. प्रतिष्ठानची वेबसाईट www.bhidekul.in निर्मिती करण्यासाठी संपूर्ण अर्थसहाय्य.



**२) उपाध्यक्ष - श्री. मुकुंद लक्ष्मण भिडे.** (वसई) वय ६४ वर्षे

भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य व विश्वस्त. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत. विविध संस्थांमधून अनेक पदांवर काम केलेले आहे. संस्थेचे कामकाज चालविण्याबाबत प्रदीर्घ अनुभव. वाढदिवस किंवा पूर्वजांचे स्मरण या निमित्ताने प्रतिष्ठानच्या आर्थिक बळकटीसाठी पुढाकार घेऊन सर्व भिडे मंडळींना प्रतिष्ठानला देणगी देण्यासाठी उद्युक्त करीत असतात.



**३) उपाध्यक्ष - कुमार विष्णू भिडे. (सांगली)** वय ७२ वर्षे

भिडे प्रतिष्ठान उपाध्यक्षपदी या वर्षी निवड. गेली अनेक वर्षे सांगली, मिरज, कोल्हापूर, इचलकरंजी या भागातील सर्व भिड्यांची माहिती कुलवृत्तामध्ये समाविष्ट करण्यासाठी पाठपुरावा करून वृत्त संकलन केले. तसेच भिडे प्रतिष्ठानच्या सभा, संमेलने, कार्यक्रम इत्यादीमध्ये सक्रिय सहभाग. आम्ही भिडे अंक प्रकाशनासाठी महत्वाचा सहभाग. प्रतिष्ठानच्या आर्थिक बळकटीसाठी ठोस प्रयत्न. सांगली येथील भिडे यंत्र, लोह उद्योगाचे प्रमुख भागीदार.




**४) कार्याध्यक्ष -**
**श्री. शशिकुमार केशव भिडे.** (पुणे)
वय - ७१ वर्षे.

अनेक वर्षे रुपी बँकेचे अध्यक्षपद भूषविले. अष्टांग आयुर्वेद सारख्या निरनिराळ्या संस्थांच्या विविध पदांवर काम केले. कुलवृत्त प्रकाशनानंतर भिडे प्रतिष्ठानची आर्थिक अवस्था बिकट असताना **'संचित निधी'** (Corpus Fund) जमा करून त्याच्या व्याजावर प्रतिष्ठानचे कामकाज चालविणे ही संकल्पना प्रथम मांडली. पुण्यामधील भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रिय सहभाग.



**५) कार्याध्यक्ष - श्री. चंद्रकांत शं. भिडे.** (ठाणे) वय ६३

भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष. ८ ते १० वर्षापासून भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रिय सहभाग. गृहबांधणी क्षेत्रातील व्यावसायिक असून भिडे कुलवृत्त प्रकाशनानंतर प्रतिष्ठान आर्थिक अडचणीत असताना प्रतिष्ठानचे कार्य अखंडपणे सुरू ठेवण्यात मोठे योगदान आहे.



**६) सेक्रेटरी - श्री. प्रभाकर शंकर भिडे. (डोंबिवली)** वय ६९

सेक्रेटरी म्हणून निवड. भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात गेली अनेक वर्षे सक्रीय सहभाग. विविध विषयांवर लेखन करण्यामध्ये यांचा हातखंडा आहे. द्वितीय कुलवृत्ताच्या आवृत्तीचे संपादक.


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : 5 to 10 H.P.
Output Capacity : 500 Kg / hr.
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : 15 to 20 H.P.
Output Capacity : 1 Tonn / hr.
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : 25 to 30 H.P.
Output Capacity : 3 Tonn / hr.
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : 3 H.P./3 H.P. / 5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 800 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

### PISTON VALVES
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

### HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)



**Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

### CASTINGS



**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece - 2 Tonn**

### S.G.IRON FOR AUTO COMPONENTS



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

### LADDLE



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**

खासगी कंपनीतून सेवानिवृत्त.



**७) जॉइंट सेक्रेटरी - श्री. दिलीप वा. भिडे. (पुणे)** वय ५६

जॉईंट सेक्रेटरी म्हणून निवड. प्रतिष्ठानच्या कार्यात गेली ७ ते ८ वर्षे सक्रिय सहभाग. सध्या पुण्यात फोर्स मोटर्स मध्ये नोकरीत आहेत. 'आम्ही भिडे' अंक, त्रैमासिक, वेबसाईट सुरु करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. प्रतिष्ठानच्या सभा, संमेलने व इतर कार्यक्रमांमधून सक्रिय. भिडे भगिनींसाठी चैत्रागौरी हळदीकुंकू आणि भोंडला यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करण्याबाबत पुढाकार.




**८) कोषाध्यक्ष - श्री. चिंतामणी ज. भिडे.** (ठाणे) वय ५१

प्रतिष्ठानच्या कामामध्ये गेली ७ ते ८ वर्षे कार्यरत. प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष म्हणून काम पाहतात. सुरुवातीला काही वर्षे नोकरी केल्यानंतर आता ठाणे येथे स्वतःचा कर सल्लागार म्हणून व्यवसाय करतात. प्रतिष्ठानच्या कोषाध्यक्ष पदाव्यतिरिक्त भिडे वेबसाइट, संमेलन व्यवस्थापन इत्यादी कार्यांमध्ये सक्रिय सहभाग.



**९) सहकोषाध्यक्ष - माधव पुरुषोत्तम भिडे (पुणे)**

प्रथमच कार्यकारिणीमध्ये सहकोषाध्यक्ष म्हणून निवड, प्रतिष्ठानची वेबसाइट कमिटी सदस्य. वेबसाईट व संपर्कासाठी गेली ४ ते ५ वर्षे सक्रिय सहभाग. मेसर्स पिकविक फूड्स मध्ये नोकरी करतात.



**१०) सदस्य - श्री. श्रीधर गो. भिडे. (मुंडाजे) कर्नाटक**

वय ५७ भिडे प्रतिष्ठानकडून कार्यकारिणी सदस्य म्हणून एकमताने निवड. कर्नाटकात रबर इंडस्ट्रीजच्या सोसायटीच्या विविध पदांवर काम. भिडे कुलसंमेलन कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सक्रिय सहभागी असतात. जाने. २०११ मध्ये मुंडाजे येथे झालेल्या अभूतपूर्व संमेलनाचे प्रमुख आयोजक.



**११) सदस्य - डॉ. विवेक यशवंत भिडे (रत्नागिरी)**

प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड, गणपतीपुळे येथे झालेल्या भिडे कुलसंमेलनाचे मुख्य व्यवस्थापन उत्तम रितीने सांभाळले. गणपतिपुळे देवस्थानचे अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच अनेक सामाजिक संस्थांमध्ये सक्रीय सहभाग. स्वतः डॉक्टर असून फार्मास्युटिकल आणि आंबा व इतर व्यवसाय सांभाळतात. कृषि सप्तक, नव उद्योजक हे पुरस्कार मिळालेले आहेत.



**१२) श्री. अजय भालचंद्र भिडे, मुंबई**

प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. गणपतीपुळे संमेलनामध्ये भिडे प्रतिष्ठानचा साहस पुरस्कार विजेता. गेली ३० वर्षे मुंबई मधून भाजपच्या माध्यमातून सामाजिक कार्य, प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रीय सहभाग. मुंबई येथे खाजगी कंपनीत नोकरी करतात.



**१३) ले.क. सुनील वा. भिडे, (पुणे)**

प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. निवृत्त सैन्य अधिकारी आहेत. सैन्यामध्ये विविध विभागांमध्ये सुमारे ४० वर्षे नोकरी करूनसुद्धा संस्कृत व मराठीवर घट्ट पकड असल्यामुळे पुण्यातून 'आम्ही भिडे'अंकामधील संपादन, जाहिरात इत्यादी कामामध्ये सक्रिय सहभाग. मुंडाजे संमेलनामध्ये साहस पुरस्कार विजेते.



**१४) श्री. विजय अनंत भिडे (ठाणे)**

वय ४९ वर्षे

प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. बायर कंपनीतून निवृत्त. ठाणे, मुंबई येथे गेली ४ ते ५ वर्षापासून भिडे प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये सक्रीय सहभाग हे उत्कृष्ट कवी व लेखक सुद्धा आहेत. क्रिकेट व बुद्धिबळाची विशेष आवड असून त्यात बक्षिसे प्राप्त केली आहेत.



**१५) श्री. चेतन विश्वनाथ भिडे, (पुणे)** वय (३१) वर्षे

प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. गेली ७ ते ८ वर्षे प्रतिष्ठानच्या कामामध्ये सक्रीय सहभाग. भिडे कुलातील तरुण वर्गाचा प्रतिष्ठानच्या कामात सक्रीय सहभाग असावा याकरिता विशेष प्रयत्नशील आहेत. खासगी कंपनीमध्ये नोकरी करतात.


आमचे ध्येय..
परिपूर्ण औद्योगिक सहाय्य !
NORTON
GRINDWELL NORTON LTD.
GRINDING WHEELS
COATED
DIMOND & CBN
NON-WOVEN (BEAR-TEX)
SAINT-GOBAIN
ABRASIVES
TOTEM
FORBS GOKAK LTD.
FORBES RECISION TOOLS
MIRANDA
Fenner
V-BELTS
POLY-F PLUS
THE MATCHLESS PERFORMER
LENOX
Bimetal Bandsaw
TAPARIA
Hand Tools
ADDISON
High Speed Steel
METAL CUTTING TOOS
THUMAX
MACHINE TOOL ACCESSORIES
PIONEER
WHEELS CASTORS & TROLLEYS
भिडे यंत्र लोह वस्तु केंद्र
मुख्य शाखा
730, गणपती पेठ, सांगली. 416 416 फोन : 0233 - 2373220, 2326478 Email : bylvk@dataone.in
कोल्हापूर शाखा
448/बी, पूना-बेंगलोर हायवे, मु. पो. नागाव, 416 122 फोन : 0231 - 2469448/49



**१६) श्री. विनायक विश्वनाथ भिडे**
वय (४७) वर्षे
प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. 'आम्ही भिडे' अंकाचे डी.टी.पी. पासून अंक मुद्रकापर्यंत पोहोचविणे याकामी व अंकासंबंधीच्या इतर कामात सक्रिय सहभाग. तसेच प्रतिष्ठानच्या इतर कामामध्ये चौफेर मदत करतात. स्वतःचा डी.टी.पी. व मुद्रण व्यवसाय आहे.



**१७) श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, (पुणे) वय (६९) वर्षे**
प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. गेली ५ ते ६ वर्षे प्रतिष्ठानच्या कामामध्ये सक्रिय सहभाग. तसेच प्रतिष्ठानच्या इतर कामामध्ये चौफेर मदत करतात. हस्तरेषा तज्ञ असून ५० वर्षाचा अनुभव आहे. पुणे, रत्नागिरी व मुंबई येथील लोकप्रिय ज्योतिषी.



**१८) श्री. बळवंत दत्तात्रय भिडे (अमळनेर)** वय ५७ वर्षे
प्रथमच कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड. प्रतिष्ठानचे सक्रिय कार्य. अमळनेर भा.ज.प. शहर सेक्रेटरी १९८० ते १९८५. प्रताप मिल मधून निवृत्त झाल्यावर जनरल इंशुरन्स कंपनीचे एजंट म्हणून १५ वर्षापासून काम करीत आहेत. एरंडोल ते शेगांव पायी वारीचे आयोजनात अनेक वर्षे सहभाग.

❖ ❖ ❖

**सर्व भिडे बंधू / भगिनी व माहेरवाशिणींना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

# भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

**जानेवारी**

१) श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा- - - - - (१)
२) श्री. मंदार उदय भिडे, देवरुख - - - (१)
३) श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे - - (१)
४) श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर - -(१)
५) श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे - - - - (३)
६) श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे - - - (६)
७) श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे - - (९)
८) सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ - - (११)
९) श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव - (११)
१०) श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई - (१२)
११) डॉ. विजय कृष्ण भिडे, भोपाळ- - (१५)
१२) सौ. शैलजा अरविंद वाळवेकर - - (१५)
१३) डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी (१६)
१४) श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे- - (२२)
१५) श्रीमती कुसुम नारायण नगरकर- (२४)
१६) सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे- (२५)
१७) श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड- (२६)
१८) सौ. मनाली मंदार भिडे, पुणे - - -(२८)
१९) श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे- - (३०)
२०) श्री. मधुकर गोविंद भिडे, गुजराथ (३१)

**फेब्रुवारी**

१) कु. राजस प्रदीप भिडे, पुणे- - - - - (२)
२) श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर- -(३)
३) श्री. सारंग शरद भिडे, पुणे- - - - - (५)
३) श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी- - (७)
४) श्री. विजय अरविंद भिडे, पुणे- - - - (८)
५) श्री. शरद नारायण भिडे, पुणे- - - - - (९)
६) सौ. गौरी श्रीगणेश जोगळेकर, कल्याण- (९)
७) श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे- - - - (९)
८) कु. इरा हर्षवर्धन भिडे, पुणे- - - - - (१०)
९) श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत (१०)
१०) श्री. वसंत रामकृष्ण भिडे, पुणे- - (१३)
११) सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई - (१३)
१२) सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव- (१५)
१३) श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण (१५)
१४) सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे- - - - (१७)
१५) श्री. उदय गजानन भिडे, देवरुख- - (१७)
१६) श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली- (१८)
१७) श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे- - - - (१८)
१८) श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे- (१९)
१९) श्री. विनायक केशव भिडे, रायगड- (२०)
२०) सौ. स्वाती राजेन्द्र भिडे, डोंबिवली- (२०)
२१) श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली (२०)
२२) श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे- - - - (२१)
२३) श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण (२२)
२४) श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे- - (२४)

**मार्च**

१) श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण - - - -(१)
२) कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा - - - - (४)
३) श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर- (७)
४) श्री. अमित ए. भिडे- - - - - - - - - (७)
५) श्री. मिलिंद मुकुंद भिडे, पुणे- - - - - - (७)
६) श्री. सुधीर केशव भिडे, पुणे- - - - - - (८)
७) सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड- - (१०)
८) श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे- - - -(११)
९) सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे- - - - (१५)
१०) श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक- - (१६)
११) श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे- - - - (१६)
१२) श्री. शरद शंकर भिडे, सांगली- - - -(१७)
१३) श्री. सुनील वामन भिडे, पुणे- - - - (१७)
१४) श्री. संजय भिडे, मुंबई- - - - - - - (१९)
१५) श्री. एम. उपेन्द्र भिडे, बेंगलोर- - - - (२०)
१६) सौ. स्वाती अजय भिडे, पुणे- - - - (३०)
१७) श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल- - (३१)
१८) सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे- - - (३१)
१९) श्री. अमोल शशिकांत भिडे- - - - - (३१)

# आदरणीय कै. मुरलीधर पंढरीनाथ घुले
# यांच्या स्मृतीस अभिवादन करून
# समस्त घुले परिवाराकडून
# ‘आम्ही भिडे’ अंकास शुभेच्छा !

श्रीमती शशी मुरलीधर घुले

श्री. मुकुल मुरलीधर घुले
सौ. गायत्री मुकुल घुले

चि. गुणेश मुकुल घुले

श्री. सिद्धार्थ मुकुल घुले
सौ. मैथिली सिद्धार्थ घुले

श्री. महेंद्र मुरलीधर घुले
सौ. प्राची महेंद्र घुले

चि. अंगद महेंद्र घुले

चि. आदित्य महेंद्र घुले

# पुतळ्यांचे सम्मेलन

प्रदीप ज. भिडे (मुंबई)

भारतवर्षातल्या अनेक आटपाट नगरातल्या पुतळ्यांनी एकदा पुतळ्यांचं राष्ट्रीय सम्मेलन भरवण्याचं ठरवलं. संमेलन कुठं भरवायचं ? यावर खूप खल झाला. संमेलनामुळं स्फोटक परिस्थिती होऊ नये याची काळजीही सर्वांना होती. प्रत्येकाला कायमस्वरूपी जागा दिलेल्या असताना असं एकदम उठून जाणं कुणालाच शक्य नव्हतं. पण स्थळ आणि जागा निश्चित होण्यासाठी पुतळ्यांमध्ये चर्चा होणं गरजेचं होतं. आयोजन समिती तयार करणं हे देखील आलं. या सगळ्या चर्चेसाठी पूर्वीच्या काळी पोस्टमनसारखी संदेशवहनाचं काम करणाऱ्या पक्ष्यांची त्यांना खूप मदत झाली. कारण प्रत्येक पुतळ्याबरोबर त्याचे हक्काचे असे काही पक्षी होते. पुतळ्यांच्या डोक्यातले विचार वाहून नेणे त्यांना सहज जमण्यातलं होतं. कारण ते आयुष्यभर त्यांच्याडोक्यावर बसत आले होते. संदेशवहनासाठी त्यांनी पक्ष्यांची निवड करण्याचं आणखी एक महत्वाचं कारण होतं ते म्हणजे गोपनीयता राखण्यात पक्षी खूप हुषार होते. आणि त्यांची भाषाच कुणाला कळण्याचा प्रश्नच नव्हता.

संमेलनाचं स्थळ कुठलं असावं यावर खूप चर्चा होत राहिली. चर्चे दरम्यान उत्तरेतील एका महिला नेत्याच्या असंख्य पुतळ्यांनी मोठ्या हिरीरीनं 'लखनौ हे शहरच सगळ्यात योग्य कसं !' यावर विचार मांडले. दिल्लीवाल्या पुतळ्यांनीही संमेलन दिल्लीतच भरवा बाकी कुठली काळजी नको . सर्व आयोजन भपक्यात होईल. असं ठासून सांगितलं. चर्चेदरम्यान पक्ष्यांची खूप दमछाक होत राहिली. कारण चर्चेची गुऱ्हाळं चालूच राहिल्यानं एका शहरातल्या पुतळ्याचे विचार इतर अनेक शहरातल्या पुतळ्यांपर्यंत नेता नेता ते दमून गेले.

असो अखेरीस सर्वांचं एकमत झालं. पण जागा कुणालाही कळता कामा नये असं ठरलं. थोडक्यात संमेलनाचे शहर कोणते ही 'टॉप सिक्रेट' बाब ठरवण्यात आली. कारण जी काही चर्चा व्हायची होती ती विधायक होती. देशभर त्याची फार वाच्यता होऊन चालणार नव्हतं, त्यातूनही २४ तास वृत्तवाहिन्यांची डोकेदुखी मानवणारी नव्हती. संमेलनाची वेळ कुठली ठेवावी यावर खूप वादंग झाले. शेवटी सर्वानुमते लागोपाठ दोन दिवस रात्री १२ ते पहाटे ५ ही वेळ मुकर्रर झाली. कारण असे होते की दिवसाची वेळ ठरली असती तर पुतळे गायब झाल्याने कारण नसताना उगाचच दंगली बिंगली पेटायच्या. थोडक्यात रात्री १२ वाजल्यापासून पुतळे त्यांच्या जागेवरून पाच तासांसाठी गायब झाले तरी कुणाच्या लक्षात येणार नव्हतं. पुतळ्यांमध्येही विविध वर्गातले पुतळे होते. काहींना वार्धक्य आले होते. त्यांना उभारणाऱ्या मंडळींना त्यांच्याआरोग्याकडे लक्ष देण्यात रस नव्हता. नव्यानं उभारलेल्यांना मात्र जगण्याची उभारी होती. मध्यरात्रीनंतर ते त्याच्या सभोवतालच्या बगीच्यातून फिरायचे. संध्याकाळी बागेत खेळणारी मुलं मधेच थांबून त्यांच्याकडे कौतुकानं बघायची. खरं म्हणजे ती पुतळ्याच्या चेहेऱ्यापेक्षा त्याच्या अंगाखांद्यावर बागडणाऱ्या पक्षांकडं बघत असायची ही गोष्ट अलाहिदा !

संमेलनाचं अध्यक्षपद कुणाला द्यायचं यावरून खूप भांडाभांडी झाली. गडकिल्ले आणि ऐतिहासिक वास्तूमधील अनेक पुतळ्यांनी जाहीर केलं की आम्ही या संमेलनात सामीलच होऊ शकत नाही. त्यांना वाटणारं कारणही तसं वाजवी होतं. ते म्हणाले, ''आमची हालतच झालीय. आमचं आरोग्य नीट राखणं हे काम पुरातत्व विभागाकडं सोपवलंय आणि ते आमच्याकडे बघतच नाहीत. 'पैसे नाहीत म्हणतात' त्यामुळे आमच्या या विकलांग अवस्थेत आम्ही संमेलनाला येणारच नाही. असो. अखेरीस बऱ्याच चर्चेअंती राजधानीतील पार्लमेंट परिसरातल्या एका मोठ्या नेत्याच्या पुतळ्याला संमेलनाचं अध्यक्षपद देण्याचं ठरलं. अध्यक्षपदासाठी उत्सुक असणाऱ्या नेत्यांचे जवळजवळ १०० पुतळे या शर्यतीत होते. शिवाय खालच्या फळीतले देशभरातले लाखभर तरी पुतळे होते. त्यांनीच एकमताने ठरवलं की अमुक एकानं अध्यक्षस्थान स्वीकारावं. त्या अज्ञात जागी जय्यत तयारी सुरु झाली. देशभरातल्या साहित्यिकांच्या पुतळ्यांसाठी मंडपातला एक भाग राखून ठेवण्यात आला. ज्या पुतळ्यांना २४ तास सुरक्षा व्यवस्था होती ते पुढच्या दर्शनी भागात बसतील असे ठरले. जिवंत असणाऱ्या नेत्यांचे पुतळेही आम्हाला पुढच्या जागा हव्यात यासाठी हटून बसले. स्थानिक स्तरावरच्या नेत्यांचे पुतळे पाठिमागच्या रांगात बसतील असे ठरले. काही नेत्यांचे प्रत्येकी ५०-६० पुतळे होते. ते सगळे संमेलनाला येऊ इच्छित होते. त्यामुळे एकाच चेहेऱ्याच्या ५० हून जास्त पुतळ्यांसाठी काही ब्लॉक्स् करण्यात आले.

संमेलनाचा मसुदा आणि नंतर सरकारकडे काय मागण्या सादर करायच्या याबद्दल चर्चेच्या अनेक फेऱ्या होत राहिल्या. संमेलन सुरू झाल्यावर वेळेचं भान राहिलं नाही तर पहाटे पाचच्या आधी आम्ही पुतळ्यांच्या डोक्यावर घिरट्या घालायला लागू असं आश्वासन पक्ष्यांनी दिलं. त्यावेळच्या एखादा फोटो काढून तो वृत्तपत्रांना दिल्यास त्यांना एक चांगला फोटो मिळेल असं त्यांच्या प्रसिद्धी प्रमुखानं म्हटलं. संमेलन ज्या ठिकाणी आयोजित केलं होतं तिथं विजेची सोय नव्हती. त्यामुळे पौर्णिमेच्या मागचीपुढची रात्र निवडण्याचं नक्की झालं.

अखेरीस ती रात्र उजाडली. 'पुतळ्यांचे राजकारण' हा पहिल्या रात्रीचा मुख्य विषय होता. ज्या पुतळ्यांना सुरक्षा

# BHIDE ASSOCIATES

**Synthesis of Finance Technology and Management**



Shri Madhavrao Bhide

Technical & Industrial Consultants, Valuers & Experts for rehabilitation / Revival of Sick Industries for banks & F.I.s experts in T.E.V. studies

**Highly motivated & successful Chief Associates of Bhide Associates in India**




**A C Bhide**
Pune



**P J Bhide**
Kolkata



**M M Gadre**
Chennai



**Suhas Jogdand**
Vodadara



**Dr. R Z Chandak**
Amravati



**Arun Shendurnikar**
Hyderabad



**Sushil Sanghi**
Nagpur



**Prashant Raut**
Mahim H.O.



**Nitin Date**
Nashik



**Rajeshree Hajare**
Raigad Region

Corporate valuers of all types of assets including flats, land, building, machinery, experts in techno economics viability studies and lenders engineers for all types of projects in India and abroad.
Consultants to 24 Nationalised, 5 Private Banks, 10 Co-op. Banks & 5 FIs

**BHIDE ASSOCIATES** Well Established For 21 Years
**Synthesis of Finance, Technology and Management**

**Head Office - Mahim, Branch Offices - Flora Fountain, Bandra and Virar**

**Total 16 Regional Offices in India** - Amravati, Ahmedabad, Aurangabad, Belgaum, Bangalore, Chennai, Delhi, Goa, Hyderabad, Indore, Kolkata, Mumbai, Nagpur, Nashik, Pune, Pen, Sangli-Kolhapur, Vadodara

व्यवस्था दिली जाते आणि ज्या नेत्यांचे ५०-६० पुतळे होते त्यांच्यावर टीकेचा रोख होता. बागेत असणाऱ्या पुतळ्यांना जे सौख्य लाभते त्यावरही चौफेर टीका झाली. चौकाचौकात दिवसभर वाहनांच्या गर्दीमुळे आणि ध्वनिप्रदूषणामुळे बेजार झालेले अगणित पुतळे, बागेत आणि अनेक सुरक्षित संकुलात राहणाऱ्या पुतळ्यांवर अक्षरशः तुटून पडले. हा वाद मिटवण्यासाठी जिवंत नेत्यांच्या पुतळ्यांनी हस्तक्षेप करून त्यांच्या नेत्यांपर्यंत ही व्यथा पोहोचवण्याचे आश्वासन दिले. प्रदूषणाची समस्या केवळ चौका-चौकातल्या पुतळ्यांपर्यंत मर्यादित नसून साऱ्यादेशाला भेडसावणारी असल्याची वैश्विक भूमिका संमेलनाध्यक्षांनी घेतली.

पुतळे विद्रूप करण्याची काही मानवांची जी प्रवृत्ती आहे त्याबद्दलही सुरक्षा व्यवस्थेत अडकलेल्या पुतळ्यांनी खेद व्यक्त केला. 'अशाने आम्ही आमचे स्वातंत्र्य गमावतो आणि २४ तास आम्हाला पोलिसांच्या व सुरक्षारक्षकांच्या गराड्यात राहावे लागते'. हे सांगताना त्यांना आपला क्षोभ आवरत नव्हता. काही जिवंत नेत्यांच्या पुतळ्यांना त्यांनी यासाठी जबाबदार धरलं आणि संमेलनात एकच गोंधळ उडाला.

विविध विषयावर दुसऱ्या रात्रीही चर्चा होत राहिली. दुसऱ्या रात्री पहाटे ३ च्या सुमाराला ज्या नेत्यांच्या जोडप्यांचे पुतळे आहेत अशा नवरा-बायकोच्या पुतळ्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. आयुष्यभर एकत्र राहूनही आता मात्र आमच्या पदरी वेगवेगळ्या ठिकाणी राहण्याचं दुःख आलंय असं म्हणताना एका पुतळाबाईना आपले अश्रू आवरणं कठीण झालं. जोडप्यांच्या पुतळ्यांची हीच सार्वत्रिक स्थिती असल्याचं भाष्य अध्यक्षांनी केलं.

अनेकांचा आणि विशेषतः अध्यक्षांचा विरोध असूनही शेवटी एक कलमी ठराव बहुमतानं संमत करण्यात आला. आणि तो असा होता की, संपूर्ण भारतात पुतळ्यांचं प्रमाण दर हजारी चार इतकं अत्यल्प आहे ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. येत्या दशकात ते किमान १०० पर्यंत जायला हवं. शिवाय अनेक पुतळे जमीनदोस्त होत आहेत. अनेकांची मरणप्राय अवस्था आहे. त्यांचीही डागडुजी होणं गरजेचं आहे. सुदैवाने या देशात अनेक जाती, पोटजाती, भाषावाद असे पोषक वातावरण आहे. जिवंत नेत्यांच्या पुतळ्यांनी या परिस्थितीला खत-पाणी घालून जास्तीतजास्त पुतळे उभारण्याचा प्रयत्न करावा. ज्या योगे पुतळे संख्या वाढत जाईल.

सरतेशेवटी या ठरावाला कडाडून विरोध करणारे संमेलनाध्यक्ष समारोपाच्या भाषणाला उभे राहिले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. ते म्हणाले,''तुम्ही समोर पाहिलत तर माझ्याच चेहेऱ्याचे पाचशे पुतळे तुम्हाला दिसतील. मी पहिला उभारला गेलो म्हणून मी या मंचावर अध्यक्ष म्हणून तुम्हाला दिसतोय. असो पण मला विचाराल तर मी सांगेन, 'मी आता या जीवनाला खूप विटलोय, सुरुवातीला अनेक वर्ष मला खूप बरं वाटायचं पण आता माझ्या हे लक्षात आलंय की समोरच्या पाचशे पुतळ्यात विभागला गेलेला मी इथं जखडून बसलोय.

मला वाटतं आपल्याला जर या यातनातून मोकळं व्हायचं असेल तर आपल्या सर्वांचं समुद्रात विसर्जन झालं पाहिजे मगच आपण नवा जन्म, नवा श्वास घ्यायला मोकळे होऊ. त्यांच्या या वक्तव्यानंतर तिथं अक्षरशः रणकंदन माजलं. इतक्यात पाच वाजायची वेळ झाल्यानं पक्षांनी किलबिलाट सुरू केला आणि सगळ्यांना आपआपल्या जागी जाण्यावाचून पर्याय राहिला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी अनेक पुतळ्यांच्या डोळ्यांखाली लोकांना अश्रू दिसले. त्यांनी ते दवबिंदू असतील म्हणून सोडून दिले !

**मोबा. ९८१९१४०९४२**

## दिलगिरी

**ऑक्टोबर २०१२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'आम्ही भिडे' (अंक १३) मध्ये तांत्रिक अडचणीमुळे काही लेखांचा मजकूर पुनःपुन्हा प्रकाशित झाला आहे, असे तीनही लेख या अंकात अनुक्रमे पान नं. १७, २१ व २३ वर पुनर्मुद्रित करीत आहोत. चुकीबद्दल दिलगीर आहोत, क्षमस्व !**

## निवेदन

आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणी यांचेकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत आहे. हा अंक शक्यतो वर्गणी न घेता चालवायचा आहे. तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी/ मदत रोख अथवा चेकने पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावी. चेक अथवा ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' या नांवानेच काढावा. त्याचप्रमाणे संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्वसुद्धा स्वीकारले जाईल.

# आवाहन

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान या न्यासाची स्थापना होऊन १३ वर्षे झाली. कुलवृत्ताच्या माध्यमातून आपण सर्व भिडे कुटुंबीय एकत्र आलो. कुलवृत्त प्रकाशनाकरिता कुलवृत्त छपाई व इतर खर्च अपेक्षेपेक्षा अधिक झाला आणि जमा झालेली रक्कम आणि खर्च याचा समतोल राहिला नाही. परंतु प्रत्यक्षात मात्र कार्यालयाचे भाडे, दूरध्वनी, संगणक, संपर्क, स्टेशनरी, वीज, टपाल, आम्ही भिडे मुखपत्राचे प्रकाशन, स्नेहसंमेलन, वार्षिक सभा इत्यादी खर्च सुरूच आहे. दरवर्षासाठी किमान ३ ते ४ लाख इतका खर्च येतो आहे. हा खर्च भागविण्यासाठी दरवेळेस भिडे कुटुंबियांकडे मदतीची अपेक्षा करणे, भिड्यांच्या भिडस्त स्वभावाला पटत नाही. म्हणून २५ लाख रुपये संचित निधी **(Corpus)** जमा करून त्याच्या व्याजातून प्रतिष्ठानची उद्दिष्टे पूर्ण करण्याचा संकल्प प्रतिष्ठानचे विश्वस्त, कार्यकारिणी आणि भिडे कुटुंबियांनी २००८ च्या किहीमच्या संमेलनात केला. त्याप्रमाणे आवाहनाला प्रतिसाद देऊन काही दानशूर भिडे व्यक्तींनी सहाय्य केले, परंतु आजमितीला ४ वर्षपूर्ण होऊन सुद्धा हा निधी १० लाखांपर्यंतसुद्धा पोहोचला नाही. म्हणून कुटुंबातील प्रत्येकाने आपला वाढदिवस, इच्छापूर्ती किंवा दिवंगत पूर्वजांचे स्मरण इत्यादींच्या माध्यमातून सर्व भिडे कुलबंधु/भगिनी/माहेरवाशिणी यांनी किमान १,०००/-रुपये तसेच आपल्या भिडे कुटुंबातील आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या, उच्चपदस्थ, व्यावसायिक, भारतातील अथवा परदेशातील भिडे कुटुंबियांनी किमान रु. ५०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम देऊन प्रतिष्ठानची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मदतीचा हात पुढे करून पुढील वर्षीच्या संमेलनापर्यंत हा निधी २५ लाखाच्या पुढे नेण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करूया !

भिडे कुटुंबियांना प्रतिष्ठानच्या माध्यमातून एकत्र जोडून कुलवृत्त प्रकाशन, वेबसाईट, ''आम्ही भिडे'' वार्षिक व तिमाही अंकाचे विनामूल्य वितरण, वैद्यकीय मदत निधी, विद्यार्थी शैक्षणिक निधी, पुरस्कार इत्यादी उद्दिष्टे काही प्रमाणात पूर्ण केली. अन्य उर्वरित उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आपण सर्वजण भिड्यांचे, भिड्यांसाठी व भिड्यांनी चालविलेल्या प्रतिष्ठानकरिता शक्य तेवढा वेळ व आर्थिक मदतीचा हात पुढे करून प्रतिष्ठानचे हात बळकट करण्यासाठी पुढे होऊया. यासाठी सर्वांना विनम्र आवाहन करतो

**कार्यकारी मंडळ, नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई**

With Best Comliments From : - - - -

**MARS**

**TEXTURES**

Painting & Textures Contractors

Ajit Bhide Mo.: 98220 53231

Shreekant Ranbhor Mo.: 94223 09380

Office : Bld. No.2, Flat No. 2,
Daulat Co-op. Soc., Karishma Square,
Karve Road, Pune - 411038

Telefax : 020-25442013
email : marstextures23@rediffmail.com

भिडे संमेलनास
हार्दिक शुभेच्छा !

**वसंत मेडिकल स्टोअर्स**

प्रोप्रा.
बल्लाळ श्रीधर भिडे

मोडक हॉस्पिटल जवळ
खेड, चिपळूण - २६० ६९३

# पुनर्जन्म

अविनाश चिं. भिडे (पुणे)

**(प्रस्तुत कथा अविनाश भिडे यांनी दीनानाथ हॉस्पिटल मध्ये असतांना लिहिली आहे. त्यांनी तेथील कॅन्सर वॉर्डामध्ये अनेक पेशंटची भेट घेतली व त्यांचा मनोदय जाणला. त्यातील एका कॅन्सर पेशंटची ''पुनर्जन्म'' ही सत्यकथा आहे.)**

मला ईश्वरकृपा हॉस्पिटलमध्ये ज्या वेळेला त्या हुशार आणि अतिशय बुद्धिमान डॉक्टरने विचारले, 'तुम्हाला काय झाले आहे याची कितपत माहिती आहे ?' मी क्षणभर थांबलो व त्यांना म्हणालो, ''कॅन्सरमध्ये लिम्फोमा'' या नावाचा जो आजार आहे तो मला झालेला आहे याची मला कल्पना आहे.'' नंतर मला क्षणभर हसू आले. साहजिकच मला कोणीतरी विचारले, ''तुला हसू का आले ?'' त्याला मी सांगितले, ''मला कॅन्सर झालेला आहे पण त्यातल्या त्यात 'लिम्फोमा' या नावाचा अगदी कमीतकमी त्रास देणारा आणि ज्यातून नक्की बरे होता येते असा आजार झाला आहे म्हणून या विरोधाभासाला मी हसलो. ''साहजिकच त्या हसण्याला कॅन्सरबद्दलचे माझे अज्ञान कारणीभूत होते.

पुढे अशी गंमत झाली की त्यामुळेच माझे बालपण परत आले. मी लहान झालो. मग माझे मन 'लिम्फोमा' या शब्दाशी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळायला लागले. 'लिम्फोमा' शब्द उलट केला की 'माफोलिं' शब्द तयार होतो. जणू काही घनदाट सावली देण्याच्या कडुलिंबाच्या झाडावरची लिंबोळी. 'लिम्फोमा' शब्दाशी अशा अनेक कसरती करताकरता मन केव्हा अंतर्मुख झाले ते समजलेच नाही. जगण्याचा खरा अर्थ जरा समजायला लागला. इतरांचे जीवन समृद्ध करणे म्हणजे काय असेल याचा उलगडाही व्हायला लागला. मग मी कोण ?, कशासाठी या जगात आलो आहे ? माझे खरे काम काय असावे ? अशा अनेक प्रश्नांनी माझ्या मनात गर्दी केली. मला आता चांगला गुरु हवा होता. काय आश्चर्य ! मीच माझा गुरु झालो होतो.

एखाद्या मेकॅनो प्रमाणे मी 'लिम्फोमा' शब्दाचे भाग करून निरनिराळ्या तऱ्हेने जोडावयास लागलो. शिवाय मला माझ्या आजारपणाची योग्य ती कल्पना देणारे डॉक्टर मिळाले होते. इतर अनेक जण माझ्या ज्ञानात भर टाकतच होते आणि तेथेच माझ्या शिक्षणाची सुरुवात झाली होती. या सर्व खेळात खरी मजा पुढेच झाली. 'लिम्फोमा' शब्दाचे मला वेडच लागल्यासारखे झाले. एका वेगळ्या जगाचाच भाग मी झालो. बाहेरच्या मोठ्या जगात राहून तात्पुरता मी एका हॉस्पिटलच्या जगाचा भाग झालो. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगामुळे ज्यांचे जग वेगळे झाले होते ते जग मला आता दिसायला लागले. मी कॅन्सरचा रुग्ण म्हणून औषध घेत होतो, तरी मला थोडेफार हिंडता-फिरता येत होते. त्यामुळेच कॅन्सर वॉर्डात फेरफटका मारणे सहज शक्य झाले. मग माझा सतत विचार सुरू झाला की, कॅन्सर रुग्णांसाठी आपल्याला काय करता येईल ? आणि आपल्याला ते केव्हा करता येईल ? कारण कायम विजय मिळविण्याची जी दुर्दम्य इच्छा निर्माण होत असे त्याचे मूळ माझ्या स्वभावातच होते. त्यामुळेच आपण काय करू शकतो या जगातल्या लोकांसाठी, याची रूपरेषा माझ्या मनात तयार होत होती. फक्त कधी करू शकेन याची मात्र कल्पना येत नव्हती.

लिम्फोमा शब्दाशी खेळता खेळता माझ्या मनात अनेक विचार दाटून यायचे. जरी औषधे चालू असली तरी पण सकारात्मक विचारांचा तुमच्या आजारपणावरती फार मोठा परिणाम होतो याची मला पूर्ण कल्पना होती. हॉस्पिटलमधे माझ्या बेडवर 'लिम्फोमा' शब्दाशी खेळताना मला काहीतरी नवीन नवीन विचार सुचायचे आणि त्यामुळेच लिम्फोमा शब्दाशी खेळण्यात मनाला फार आनंद व्हायचा. हॉस्पिटलमध्ये मला जरी जास्ती फिरता आले नाही तरीपण जेवढे शक्य झाले तेवढे फिरून कॅन्सर झालेल्या काही लोकांबरोबर मी बोललोही. असे करता करता त्या हॉस्पिटलमधील माझे वास्तव्य संपत आले. शेवटी एक दिवस मी बरा होऊन आपल्या मोठ्या जगात परत आलो. तरीपण 'लिम्फोमा' शब्दाशी खेळणे माझ्या मनाने सोडले नव्हते. कारण तो शब्द माझ्या मनात खोल जाऊन बसला होता. मग मला कळून चुकले की आपले मन बेचैन आहे याला कारण म्हणजे त्या जगात असताना मी केलेला एक निश्चय, की आपण बरे झाल्यानंतर इतर कॅन्सरच्या रुग्णांसाठी काहीतरी करायचे, त्यांच्यात जगण्याची उभारी निर्माण करायची. काय करावे ? कसे करावे ? याची दिशा विचार करून करून सुद्धा मिळेना. शेवटी मी परत ईश्वरकृपा हॉस्पिटलमध्ये गेलो व कॅन्सरने आजारी असलेल्या पेशंटना भेटू शकतो का याबद्दल विचारणा केली. अशी विनंती याच्यापूर्वी कोणीच केली नव्हती. माझ्या प्रश्नाचे उत्तर साहजिकच 'नाही' होते. शेवटी मी जेव्हा त्यांना सांगितले की त्याच जगात मी होतो आणि कदाचित मी जर त्यांना भेटू शकलो तर त्याचा काही उपयोग तुमच्या रुग्णांना होईल. साहजिकच मला नंतर परवानगी मिळाली आणि प्रथमच माझी गाठ, एका हुषार पण कॅन्सर झालेल्या इंजिनियरशी पडली की ज्याने आपल्या सर्वस्वाची आशा सोडली होती. मला एक जाणीव होती की, आपल्यात काहीतरी बदल घडवून आणणे जरुरीचे आहे. याची जाणीव माणसाला होते, त्याचवेळेस त्याचे जग बदलते आणि खऱ्या अर्थाने तो जन्माला येतो, त्यालाच आपण पुनर्जन्म म्हणतो.

कॅन्सर झालेल्या रुग्ण तरुण इंजिनियरने माझ्याशी

**With Best Comliments From . . .**

PA

# PANDIT AJGAONKAR ASSOCIATES

SHRIYA, S. No. 41/16, ERANDAWANE,
TARATE COLONY, PUNE - 411 004
2544 7497/ 2544 7498

बोलायला नकार दिला. तरीही अनेक वेळेला मी त्याच्या जवळ नुसताच बसून राहिलो आणि मग तो दिवस एकदा उजाडला. मला अनेक वेळेला त्याच्याजवळ नुसताच बसलेला पाहून शेवटी त्याने एकदा मला प्रश्न केला की, ''तुम्हाला काय हवे आहे ? तुम्हाला माझी मुलाखत हवी आहे का ? तुम्ही माझे सांत्वन करायला आला आहात किंवा मला एका स्वप्नसृष्टीत घेऊन जाण्यासाठी आला आहात का ? '' साहजिकच त्याच्या या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नव्हते. तरीही त्याच्याकडे रोज एकदा जाऊन त्याच्या जवळ बसण्याचे मी सोडले नाही. हळूहळू माझ्या प्रयत्नांना यश येऊन त्या इंजिनियरने माझ्याशी बोलायला सुरुवात केली. त्याच्या १० वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्याने किती लढाया जिंकल्या होत्या हे कळून मी थक्क झालो आणि कळून चुकले की आपण एका वेगळ्याच वीराला भेटत आहोत. फक्त त्याला हे माहित नव्हते की तो स्वत: यशस्वी वीर आहे. येथे माझे खरे काम होते ते म्हणजे त्या इंजिनियरला त्याच्यातल्या गुणांची आणि लढाऊ वृत्तीची जाणीव करून देणं. काही दिवस गेले तरी माझा त्याच्याकडे जाऊन बसण्याचा परिपाठ काही चुकला नाही. जरी माझ्या मनात काही वेगळी कल्पना होती, तरी एकेदिवशी मी त्याला सांगितले की, ''खरे म्हणजे मेकॅनो खेळायला मला कोणीतरी पार्टनर हवा आहे.'' इंजिनियर असल्यामुळे मेकॅनो म्हणताक्षणी त्याच्या चेहेऱ्यावर मला आनंद फुललेला दिसला. ''पण तुमच्याकडे लेगो कोठे आहे ?'' ''अरे लेगो नसतानाच खेळण्यात खरे कौशल्य आहे.''

आता उदाहरण द्यायचे म्हटले तर प्रथम फक्त लिम्फोमा नावाचा एकच शब्द होता. त्या शब्दामध्ये आणि काही शब्द घालून मी शब्दकोडे रचण्याचा खेळ सुरू केला.'' मी सांगू लागलो. आता नवीन काहीतरी विशेष बनवायचे म्हणजे आणखी काहीतरी लेगोचे भाग पाहिजेतच. साहजिकच मला अनेक शब्द सुचू लागले की, ज्याचा उपयोग नक्की काहीतरी नवीन शब्दकोडे बनविण्यासाठी होऊ शकेल. मला सुचलेले शब्द उदा. 'फायटर', 'सोल्जर', 'लढाई' आणि इतर काही. त्यानेही अनेक शब्दांची भर त्यात घातली. कागदावर चौकोन आखून आम्ही मग शब्द पूर्ण करण्याच्या खेळात पूर्णपणे रंगून गेलो. या सर्व खेळात तो पूर्णपणे स्वतःचे आजारपण (कॅन्सर) वगैरे विसरून गेला होता. मला तरी आणखी काय पाहिजे होते ? माझ्या प्रत्येक भेटीत आमचा शाब्दिक लेगोचा खेळ खुलू लागला. तो आणि मी मनाने आणखी जवळ आलो होतो. हळूहळू त्याचा मूड पाहून, मी कॅन्सर होऊन पूर्णपणे बरे झालेल्यांच्या गोष्टी सांगायला सुरुवात केली. तो लक्षपूर्वक त्याऐकू लागला, त्यात रंगून जाऊ लागला. तरीही ज्या वेळेस मी त्याच्या चेहऱ्यावरचे खरे हास्य पाहणार होतो, त्याचवेळेस मी थोडीफार लढाई जिंकली असेन असे म्हणता येणार होते. विशेषतः मी स्वत: हास्याचा उपासक नसताना हे फारच कठीण होते. पण हळूहळू आढळून आले की मला तो खरोखरच चांगला मित्र समजायला लागला होता.

एक दिवस त्याच्याकडून त्याची चित्तरकथा ऐकता ऐकता मी सहज विचारलं की, ''आणखीन काय मोठे कार्य तुला हातून घडावे असे वाटते ?'' आणि ज्या तरूण इंजिनियरने पूर्वी अगदी नकारात्मक प्रतिसाद दिला होता, त्याच्या चेहऱ्यावर थोडे स्मित मला प्रथमच पहायला मिळाले. मग तो विषय तसाच सोडून दुसऱ्या दिवशी मी त्याला हाच प्रश्न विचारला. आणि त्याच्या डोळ्यात चमक दिसली. तो म्हणाला, ''तुम्ही कसे ओळखले की मला काहीतरी मोठे कार्य करायचे आहे ? जे माझ्या समाधानासाठी असेल आणि ते माझे प्रेरणाकार्य असेल ?'' नंतर त्याने आपल्या महत्त्वाकांक्षेची अलिबाबाची गुहाच मला दाखविली आणि ती पाहताना माझे डोळे दिपून गेले. त्याला एक व्यवस्थापनावर पुस्तक लिहायचे होते. एका कारखान्यासाठी ऑटोमेशन करण्याचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करायचे होते. सर्वात महत्वाचे म्हणजे त्याला एक परिपूर्ण इंजिनियर व्हायचे होते आणि इतरांचे तसे घडवायचे होते. इतर अनेक गोष्टी होत्या. त्यानंतर मग निरगाठेची सुरगाठ व्हायला वेळ लागला नाही. मी जेव्हा त्याला सांगितले की माझ्या मनातल्या प्रेरणेमुळेच मी ह्या मोठ्या जगात परत आलो. तुला तसेच करावयाचे आहे ? तुला तुझीच खूप गरज आहे. जेव्हा मी माझे प्रेरणाकार्य त्याला विस्ताराने सांगितले तेव्हा अंत:स्फूर्तीने म्हणाला, ''अहो, आपली कुंडली जमली की हो !'' मी आनंदाने म्हणालो, ''मग द्या तर टाळी.'' आणि त्याने खुल्या मनाने मला टाळी दिली. तिथेच त्याचा खराखुरा 'पुनर्जन्म' झाला.

**मोबा.-९८२३०५११९८१**


## 'आम्ही भिडे' जाहिरात दरपत्रक

१) वार्षिक मलपृष्ठ रंगीत (पान ४) - - - रु.४,०००/-
२) वार्षिक रंगीत (पान २) - - - - - - - रु.३,०००/-
३) वार्षिक मलपृष्ठ रंगीत (पान ३) - - - रु.३,०००/-
४) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान
ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाइट - - - - - - रु.२,०००/-
५) त्रैमासिक/वार्षिक अर्धपान
ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाइट- - - - - - रु.१,०००/-
६) त्रैमासिक/वार्षिक पाव पान
ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाइट- - - - - - - रु.५००/-
७) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी
ब्लॅक अ‍ॅन्ड व्हाइट- - - - - - रु.५००/-
८) वार्षिक अंक प्रायोजकत्व - - - - - रु. ३०,०००/-
९) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व - - - - - रु. ८,०००/-

*** भिडे संमेलना करिता बॅनर**
**संपूर्ण संमेलना करिता - - - - रु. ३,०००/-**

With Best Compliments From

PICKWICK®
"Eet sum mor!"




PICKWICK HYGIENIC PRODUCTS PVT. LTD.

***Regd. Office :***
Atur House, Flat C, 87/A, Dr. A.B. Road,
Worli, Mumbai-400018.
Tel.: 022-2493 4154 / 2498 0614

***Head Office :***
7, Raj Palace, S.No. 862, Plot No. 288,
Bhandarkar Institute Road, Pune-411004.
Tel. : 020-25654994 / 8330
Fax : 020-25656378
Email : pickwick@pn2.vsnl.net.in
pickwick@pickwick.in
Website: www.pickwick.in

# भिडे प्रतिष्ठानचे आधारवड आणि कुशल संघटक, स्व. दामोदर केशव भिडे यांना भिडे कुलबंधु/भगिनी/माहेरवाशिणींतर्फे आदरांजली

(दिलीप वा. भिडे.) पुणे.



माझे सामाजिक कार्यातील गुरू, भिडे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ आणि प्रतिष्ठानच्या बाल्यावस्थेपासून प्रतिष्ठानला आणि आमच्यासारख्यांना काम करण्याची ताकद देणारी ऊर्जा म्हणजेच दामोदर केशव ऊर्फ दामूकाका भिडे. नुकतेच त्यांचे अल्पशा आजाराने ११ ऑगस्ट रोजी निधन झाले.

दामूकाकांची व माझी ओळख गेल्या १०/१२ वर्षांपूर्वीची. माझ्यामध्ये असलेली सामाजिक कामाबद्दलची रुची नूमवि पुणे येथे झालेल्या भिडे प्रतिष्ठानच्या संमेलनात त्यांनी हेरली. माझा स्वभाव, प्रतिष्ठानच्या कामातील माझा रस, तसेच सांगितलेल्या कामाबद्दल त्वरित निर्णय देणे हे पाहून त्यांनी मला तळेगावच्या संमेलनाच्या नियोजनात सहभागी करून घेतले. त्याचवेळेस दुसऱ्या कुलवृत्ताच्या आवृत्तीचे काम झपाट्याने सुरू झाले होते. पुण्यातून काही काम करायचे असेल अथवा काही मागवायचे असेल तर मला संपर्क करू लागले. पुण्यामध्ये आलेली माहिती गोळा करून ती ठाणे येथे प्रतिष्ठानच्या ऑफीसमध्ये पाठवायची असताना दामूकाकांच्या घरापर्यंत पोचविण्याकरिता डोंबिवलीचेच एक भुरके नावाचे मित्र दर बुधवारी पुण्यातून डोंबिवलीत जायचे व शुक्रवारी परत येताना दामूकाकांकडून पुण्यात पाठवायचे पाकीट घेऊन यायचे. असे जवळजवळ २ वर्षे चालले होते. त्यामुळे प्रतिष्ठानचे कुरिअरचे पैसे वाचत आणि घरपोच सेवाही मिळे. यामुळे संबंध घनिष्ठ होत गेले. मला कुलवृत्ताच्या लेखन कार्यातही सहभागी करून घेऊ लागले. त्यानंतरच्या २००६च्या तळेगावच्या संमेलनात मी आणि चिंतामणी आम्हा दोघांना सर्वप्रथम त्यांनीच व्यासपीठावर बोलण्यास भाग पाडले. खरंतर मी त्यांना सांगितले की दामूकाका नावाप्रमाणे मी भिडस्त आहे, परंतु त्यांनी आम्हा दोघांना सत्कारार्थींची ओळख व्यासपीठावरून करून देण्याचे काम दिले. तुला जे काय बोलायचे आहे ते तू एका कागदावर लिहून काढ, त्यांचे मुद्दे लक्षात ठेव आणि बोल आणि हेही जमत नसेल तर तू कागदावर लिहिले आहेस तसेच वाच, पण ही कामगिरी तुलाच पार पाडायची आहे, यात बदल होणार नाही. असे ठामपणे सांगितले. म्हणजेच कार्यकर्त्यांची फळी कशी निर्माण करावयाची, प्रतिष्ठानच्या कामात सहभागी कसे करून घ्यायचे यामध्ये दामूकाका माहीर होते. त्यानंतर पुण्यातून चित्पावन संघातर्फे जागतिक चित्पावन महासंमेलनाची घोषणा झाली आणि संमेलनाचे नियोजन, कार्यक्रम याबाबत सतत संपर्क करीत राहिले. प्रतिष्ठानचे एक ज्येष्ठ आपल्यावर ही जबाबदारी सोपवीत आहेत हे पाहून मी २००७ च्या संमेलनात जास्तीत-जास्त भिडे मंडळी, कार्यकर्ते, हितचिंतक हजर असावेत म्हणून दरमहा भिडे कुलबंधू/भगिनींच्या बैठका घेऊ लागलो. पहिल्या १/२ बैठकांना बऱ्यापैकी संख्या होती परंतु नंतरच्या बैठकांमध्ये ही संख्या अगदी ५ ते ६ वर आली. मी निराश होऊन दामूकाका व प्रभाकरपंत यांना ही कामगिरी अवघड आहे असे सांगितल्यावर दामूकाकांनी व इतर लोकांनी धीर धरण्यास सांगितले. तू काम नेकीने करतो आहेस, प्रतिष्ठानला नक्कीच फायदा होईल Go Ahead असे सांगितले. परिणामत: न भूतो न भविष्यति असा प्रतिसाद मिळून १७०० भिडे लोकांचे बुकिंग होऊन जवळजवळ ११०० ते १२०० भिडे संमेलनाला हजर होते हे विशेष! त्या संमेलनांतर्गत नामांकित ५ भिडे व्यक्तींचा मुलाखतींचा कार्यक्रम ठेवावा कां ? तर त्या व्यक्ती कोण म्हणून बैठकीत ५ नावे निश्चित करण्यात आली. त्या ५ व्यक्तींपैकी दोन व्यक्ती म्हणजे सध्याचे कार्याध्यक्ष शशिकुमार व चंद्रकांत भिडे या होत्या. पुढे मागे या व्यक्तींना आपल्या प्रतिष्ठानच्या कामात सहभागी करून घेण्याचा त्यांचा मानस असावा. कारण त्यानंतर दोनच वर्षांनी त्या दोघांची कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली. हा त्यांचा दूरदर्शीपणाच नाही कां? प्रतिष्ठानमध्ये एखादी व्यक्ती सक्रिय होत असेल तर त्याला योग्य तो सन्मान देऊन त्याला कामामध्ये सहभागी करून घेण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती हे सध्या सक्रीय असलेले ले. क. सुनील, अजय, विजय आणि अजय अनंत, विनायक विश्वनाथ, माधव पुरुषोत्तम, रामचंद्र प्रभाकर इत्यादी सदस्यांच्या सहभागाने दिसून येते.

२००८ च्या सुरुवातीस दुसऱ्या कुलवृत्त प्रकाशनाची घाई होती. त्यामध्ये ज्या ज्येष्ठ भिडे मंडळींनी कुलवृत्त प्रकाशनाच्या कामात सक्रिय राहून ते पूर्णत्वास नेले अशा काही ज्येष्ठ भिड्यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्याचे प्रदीपजी, मी, चिंतामणी आणि अतुल भिडे यांनी गुपचूप ठरविले. हे ज्येष्ठ भिडे म्हणजे कै. दामूकाका, श्री. प्रभाकरपंत, श्री. विनायक सखाराम, व्यंकटेश, रमेशराव आणि विद्याकर भिडे हे होत. प्रकाशना अगोदर २/३ दिवस ही बातमी जेव्हा दामूकाकांच्या कानावर गेली त्यावेळेस ते आम्हाला म्हणाले की आमच्या बरोबर तुमचाही मानपत्र देऊन सत्कार होणे आवश्यक वाटते. काही केल्या ते ऐकेनात म्हणून सरतेशेवटी प्रदीपजींनी त्यांना सांगितले की हे मानपत्र फक्त ६० वर्षांवरील ज्येष्ठ कार्यकर्त्यांसाठीच आहे, त्यामध्ये मी सुद्धा नाही. यावरून काम करणाऱ्याला योग्य तो मान मिळायला हवा अशी

हार्दिक शुभेच्छा !

# दि आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

**केंद्र कार्यालय-**
**अर्कशाला भवन**
१६५/१६६, शुक्रवार पेठ,
डॉ. एम. एन. आगाशे चौक,
राजवाडा शाहुपुरी रोड,
गेंडामाळ नाका, सातारा - ४१५००२
फोन : ०२१६२-२५१६७५

**विक्री केंद्र -**
**राजधानी टॉवर्स,**
जी - १, राजधानी टॉवर्स,
राजवाडा सातारा.
फोन : ०२१६२-२८०१५५

www.ayurved_arkashala@yahoo.com



दामूकाकांची मानसिकता होती.

कुलवृत्त प्रकाशनानंतर प्रतिष्ठानचे एक उद्दिष्ट संपले. आता फक्त दरवर्षी संमेलन घ्यायचे, संपर्क ठेवायचा, वार्षिक सभा घ्यायची आणि प्रतिष्ठानची प्रगती साधायची असा मानस होता. कुलवृत्त छपाई करिता खूप पैसे खर्च झाले होते त्यामुळे आर्थिक चणचण भासू लागली. त्यातच प्रतिष्ठानमधील काही ज्येष्ठ लोकांना घरगुती अडचणी आल्या. आता हे प्रतिष्ठान बंद होणार की काय असे वाटू लागले परंतु दामूकाकांना व आम्हाला चालत्या गाड्याला खीळ बसू नये असे वाटत होते. प्रतिष्ठानच्या वरिष्ठ कार्यकारिणीमध्ये दोन कार्याध्यक्षांच्या नेमणुका करण्याकरिता प्रदीपजींना सुचविण्यात आले. त्यामध्ये काहीं तांत्रिक अडचणी होत्या. परंतु त्या अडचणी सुटतील हे गृहीत धरून प्रदीपजींनी २ कार्याध्यक्षांची नेमणूक केली. आणि आज त्या दोघांच्या नेमणुकीमुळेच मावळत चाललेले प्रतिष्ठान पुन्हा एकदा भक्कम पायावर उभे आहे. ही दूरदृष्टी दामूकाकांनी त्यावेळेला ठेवलेली असल्यामुळेच हे शक्य झाले. असे मला विशेष करून नमूद करावेसे वाटते.

भिडे प्रतिष्ठानचे कोणतेही काम म्हणजे संमेलन, वार्षिक सभा नियोजन, 'आम्ही भिडे' अंक, विद्यार्थी गुणगौरव वा ज्येष्ठांचा सत्कार असो या सर्व बाबींचे नोटिंग, लेखन, हिशोबात पारदर्शकता, संपर्क याबाबत त्यांचा हातखंडा होता. 'आम्ही भिडे' अंका बाबत नुकतीच घडलेली एक घटना म्हणजे एका अंकात संमेलनात पुरस्कार दिलेल्या पुरस्कर्त्यांचा नामोल्लेख चुकून केला गेला नाही. दामूकाकांच्या नजरेस ही गोष्ट आली त्यावेळेस त्यांनी प्रांजळपणे आपली चूक कबूल केली एवढेच नव्हे तर त्यांनी एक माफीपत्र सुद्धा पाठविले. ते पत्र पाठविण्या अगोदर मलासुद्धा दाखविले होते. त्या वेळेस मी दामूकाकांना म्हणालो की, अशा अनभिज्ञपणे झालेल्या चुका खरंतर आपल्या लोकांनी स्वत: समजून घ्यायला हव्यात तसेच तुम्ही या अंकाचे संपादकही नाही आणि हा लेख सुद्धा लिहिलेला नाही, दुसरे म्हणजे अशा अनभिज्ञ चुका, मनुष्यबळ कमी आहे असे गृहीत धरून तक्रार करणाऱ्याने पोटात घालायला हव्यात. यावर ते म्हणाले मी ३५ ते ४० वर्षे टाईम्स मध्ये काम केले परंतु १ अधिक १ म्हणजे दोनच यायला हवे. ज्या ठिकाणी आपली चूक आहे त्या बद्दल कमीपणा कशाला वाटायला हवा ? दुसरे म्हणजे सामाजिक काम करताना, कार्यकर्ते जोडताना आपण प्रतिष्ठानचे काम करतो आहोत, वैयक्तिक नव्हे ! असे जाणून आपण दुसऱ्यावर चिडून राग-राग करून आपल्याला सामाजिक काम केल्याचा आनंद मिळणार कसा ? सामूहिक जबाबदारी स्वीकारून मी ही चूक मान्य करून त्यांना पत्र पाठविले आहे. हा त्यांचा मोठेपणा मला भावला.

या वर्षीचे ऑडिट अजून व्हायचे आहे. पुण्यातून मी सर्व हिशेब करून त्यांना पाठवीत असतो. त्यानंतर ते सर्व व्हाऊचर/बिले, तपासून पुढे ऑडिटरकडे देत असत. दोन महिन्यापूर्वी पुण्यातून पाठविलेले हिशेब सर्व बरोबर होते परंतु ५१ रुपयाचा गोंधळ होत होता. त्यामध्ये ५० रु. चा हिशेब लागला परंतु १ रु. चा हिशेब लागत नव्हता. ते मला सतत ८ दिवस फोनवर सांगत होते की १ रु. प्रतिष्ठानकडे अधिक जमा झाला आहे तो कुठून आला हे समजत नाही. सरतेशेवटी त्यांनी १ रु. चे क्रेडिट बँकेने चुकून दिलेले आहे हे शोधून काढले. मी त्यांना म्हणालो १ रु. वाढतो आहे ना कमी तर होत नाही ना, यावर ते म्हणाले की वार्षिक सभेच्या वेळेस सहसा आपल्याला कोणी भिडे मंडळी त्रास देत नाहीत परंतु आपले हिशेब चुकता कामा नयेत. टाइम्स् मध्ये चीफ मॅनेजर फायनान्स्ला काम केल्यामुळे अचूकपणे काम करण्याची ही सवय त्यांनी आम्हालासुद्धा लावली आहे.

दामूकाकांचा व माझा दररोज किंवा दिवसाआड फोन होत असे. ४ ते ५ दिवसात त्यांचा फोन नाही म्हणून मी सारखा प्रयत्न करीत होतो. परंतु प्रतिसाद मिळत नव्हता म्हणून मी त्यांच्या पुण्यातील कन्येला फोन लावला आणि त्यांचे मेडिकल् रिपोर्टस् आणि आजार या बद्दल मला कल्पना आली व मी सुन्नच झालो. अक्षरश: पाचच मिनिटांनी दामूकाकांचा फोन आला व ते म्हणाले ''अरे मला ४/५ दिवस ताप येतोय प्रकृती बरी नाही, उद्या दवाखान्यात दाखल होतोय. आता काय माझी २/३ आठवडे तरी दवाखान्यातून सुटका होईल असे वाटत नाही. मी घरी आलो की मग काय ते बोलू ! तत्पूर्वी तू कागदपत्रे माझ्याकडे न पाठविता ठाण्याला चिंतामणीकडे पाठव''. मी म्हणालो अहो तुम्ही ठणठणीत व्हा मग काय ते बघू या. असे म्हणताना त्यांच्या प्रकृतीबद्दल आजाराबद्दल मला कल्पना असल्यामुळे मी त्यांच्याशी खोटे बोलतोय हे जाणवत होतं. त्यानंतरच्या आठवड्यात दिवसाआड संपर्कात होतो आणि एकेक दिवस पुढे चालला होता. दामूकाकांना पुन्हा भेटून बोलण्याच्या आशा मावळत गेल्या कारण नियतीने डाव साधला होता. त्यांच्या अंत्यसंस्काराला मला काही तांत्रिक अडचणींमुळे जाता आले नाही. याची सल कायमच राहील.

दामूकाका सत्तरीपेक्षा जास्त वयाचे असले तरी तरुणाला लाजवेल असा अफाट उत्साह त्यांचेकडे होता. 'जिथे कमी तिथे मी' अशी त्यांची वृत्ती होती. त्यांच्या आजाराची मला पूर्णपणे कल्पना होती. त्या दिवसातच एक दिवस पुण्यात विनायक भिड्यांना मी उद्विग्न होऊन म्हणालो की मीसुद्धा राजीनामा देतो, मलासुद्धा प्रतिष्ठानचे काम करणे शक्य नाही. विनायकने त्यावर प्रतिक्रिया दिली नाही परंतु नंतर मीच विचार केला की दामूकाकांचा प्रतिष्ठान हा श्वास होता, त्यांच्या पश्चात आपणसुद्धा हा श्वास बंद केला तर त्यांना काय वाटेल ? ते म्हणतील एवढे वर्ष मी तुला काही सांगितले शिकविले त्याचा काहीच उपयोग नाही असे वाटून ते खट्टू होतील. आपण हे काम असेच सुरू ठेवणे हीच त्यांना आदरांजली आहे. सर्कशीतला एखादा जोकर लोकांना हसवीत असतो परंतु त्याच्या ह्रदयात कुठेतरी दु:ख लपलेले असले तरीसुद्धा त्याला लोकांना हसवत ठेवावेच लागते. दामूकाकांशिवाय हे प्रतिष्ठान चालवायचे आहे ही कल्पना मनाला मान्य नाही तरीसुद्धा भिड्यांकरिता, भिड्यांनी सुरू केलेले हे प्रतिष्ठानचे कार्य आपल्याला

. . . . .पुढील मजकूर पान नं. २१ वर

With Best Compliments From ----

**M/s Satara Steels**

Plot No. :- B-1, Old M.I.D.C. Area,
Satara - 415 004, Maharashtra.
Tel : (02162) 246194
(Industrial Fabricators, Wind-Solar Hybrid Projects)

भावे

*Bhave Supari | Badishep*

905, Shaniwar Peth Satara - 41002. Ph. (02162) 23792. Mo.: 9822284287
Email :- str_bashwini@sanchamet.in

(१९५५ साला पासून)

सातारहून जाताना काय नेणार ?

प्रत्येक उत्पादनाचे खास वेगळेपण व चव

१) मसाला सुपारी
२) मसाला बडिशेप
३) मुखशुद्धी
४) मसाला पान
५) खजुर पान
६) मिठा मुखवास पाचक
७) सुपारी बिना सुपारी
८) मिक्स् बडिशेप
९) आवळा सुपारी

**सर्वांना आवडते** **सर्वत्र मिळते**

**भावे**

प्रत्येकास जेवणानंतर आठवण होणारे नाव

भिडे प्रतिष्ठानचे आधारवड, पान . . . नं. १९ वरून पुढे चालू . . . .
पुढे न्यायचे आहे. ''शो मस्ट गो ऑन''.

एक कुशल संघटक आणि प्रतिष्ठानचा आधारवड आज आपल्यात नाही. सहकाऱ्यांशी मनमोकळे, मिश्किलपणाने, वडीलधारे असूनसुद्धा मित्रत्वाच्या नात्याने वागून वेळप्रसंगी आपली चूक प्रांजळपणे कबूल करण्याचा निर्मळपणा त्यांच्याकडे होता. प्रतिष्ठानच्या कामातील दर्जा आणि जमाखर्चातील तडजोड त्यांना कधीही मान्य नव्हती. कार्यमग्नता व्हावे जीवन, मृत्यू हीच विश्रांती ! हे वचन त्यांनी सार्थ करून दाखविले. त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांची शिकवण व अनुभव आम्ही कधीच विसरणार नाही.

मो. ९६५७५४१२३६

## गुणवंत भिडे आवाहन

**भिडे कुलातील बंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी त्यांच्या कलागुणांच्या जोरावर वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष चमकदार कामगिरी करून पुरस्कार, गौरव, मानसन्मान प्राप्त केले असतील अथवा काही उल्लेखनीय व विशेष कामगिरी केली असेल. अशा व्यक्तींची माहिती फोटोसह प्रतिष्ठानकडे पाठवावी. अंकातील जागेनुसार त्याला प्रसिद्धी दिली जाईल. तसेच एखादे चांगले काम असूनसुद्धा त्याला पारितोषिक, पुरस्कार, बक्षीस मिळाले नसेल तरीसुद्धा त्याची दखल आम्ही घेऊ. कृपया नोंद घ्यावी ही नम्र विनंती !**

## हृद्य आठवणी

प्रकाश व विलास भिडे.
मोबा – ९८९०६५९५३४

फळाची अपेक्षा न करता कर्म करीत रहावे असं आपल्याकडे फार पूर्वीपासून सांगितले आहे. पण उक्ती कृतीत आणणारे विरळाच. काहीजण अडचणीच्या काळात आपण परिस्थितीवर कशी मात केली अशी आत्मस्तुती करून स्वत:तच आत्ममग्न असतात तर काहीजण काहीच न बोलता आपण कसे जगावे याचा आदर्श वस्तुपाठ त्यांच्या बोलण्याचालण्यातून समोर ठेवत असतात. याच पठडीतील आमचे बंधू म्हणजे श्री दामोदर केशव भिडे. आम्ही त्यांना वडीलकीच्या नात्याने तात्या म्हणत असू. वयाच्या ७२ व्या वर्षीसुद्धा त्याने स्वत:ला कामात गुंतवून ठेवले होते. घरी बसून तो निवृत्त जीवन जगला नाही. सामाजिक बांधिलकीतूनच त्याने नोकरीतून निवृत्त झाल्यावरसुद्धा निस्पृहतेने आपले कार्य चालूच ठेवले.

असं आढळून येतं की सख्खे बहिण–भाऊ बरेच असतील त्यांचा एक वेगळा गोतावळा तयार होतो त्यांचे वेगळे वलय तयार होते. मग सख्खे–चुलत वगैरे असे भेदभाव सुरू होतात. पर्यायाने नाती हळूहळू लांब होत जातात. पण तात्याचा स्वभावच असा होता की सख्खी सहा भावंड असूनही आम्हाला चुलत भावाच्या नात्याची जाणीव झाली नाही. आम्हाला सुद्धा त्याचा एक मौलिक आधार होता. घरात कुठचेही कार्य असो त्याच्या उपस्थितीशिवाय एक पानही हालत नसे. तो असल्याने सर्वांना उत्साह वाटे, सर्वजण कामास लागत व कार्य सिद्धीस जाई. आम्ही तसे सख्खे–चुलत मिळून आठ भाऊ व तेरा बहिणी. या सर्वांच्या लग्नकार्यामध्ये तात्याचा सहभाग कायम असे. एवढेच नव्हे तर पुढील पिढीतील भाचे भाच्या यांच्या मुंज, लग्नाच्या बैठकीपासून ते सूप वाजेपर्यंत त्याचा सहभाग असायचा आणि हे करत असताना सख्खे–चुलत असा भेदभाव कधी जाणवू दिला नाही. त्याचा हा स्वभाव त्याने कुटुंबापुरताच ठेवला असे नाही तर भिडे प्रतिष्ठानच्या मुहूर्तमेढीपासून आजतागायत त्याचा हा सहभाग सर्वश्रुत आहे. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची ही गंगा चालू ठेवण्यासाठी त्याने जितक्या भिडे कुटुंबियांना भेटी दिल्या असतील व पत्ररूपाने त्यांच्या किती भेटी घेतल्या असतील याची गणना करणे शक्यच नाही. त्या सेवा धर्मामध्ये कित्येक कडूगोड अनुभव आले. काहींच्या घरी तर फारच वाईट वागणूक मिळूनसुद्धा त्या व्यक्तीबद्दलचा कटूपणा मनात ठेवला नाही. उलटपक्षी अशांपैकी काहींचा त्याने जाहीर सत्कारही केला. त्याला ज्यावेळी हटकले त्यावेळी त्याने सांगितले की आपल्या नित्युंदन गोत्रीय भिडे कुटुंबातील ज्याने कोणी चांगले कार्य केले असेल ते आपण इतरांस सांगावयास हवे. आता अशांपैकी काहीजणांनी मला चांगली वागणूक दिली नसली तरी ती मनात न ठेवणे हे उत्तम. गोड व मधुर आठवणीच मनात ठेवाव्यात व इतर कडू आठवणी मनातून काढून टाकाव्यात. आपण जे काही करतो ते मनापासून करतो व त्यात प्रत्येकवेळी आपल्याला चांगले अनुभव येतीलच असे नाही हे गृहीतच धरावयास हवे अन्यथा आपला उत्साहच राहणार नाही. या त्याच्या स्वभावामुळे भिडे कुटुंब, भिडे प्रतिष्ठान, सावरकर प्रतिष्ठान यांसाठी त्याचे आयुष्य कारणी लागले.

त्याच्यामध्ये इतकी अफाट ऊर्जा ठासून भरलेली होती की आम्ही सर्व भावंडे अचंबित होत असू. त्याचे सदैव भ्रमण चालत असे. पण प्रत्येक कार्यात तो असे हे नक्की. आणखी आमच्या सर्व पिढ्यांमध्ये प्रत्येकाशी संवाद साधणे हे त्याला जमायचे. सर्वांचे मन आणि मान राखून कोणालाही न दुखावता सर्वांशी त्याचे संबंध अतिशय सुरेख असायचे आणि हे सर्व स्नेह आणि मायेने आलेले. अशी माणसे पुन्हा होणे नाही. आमचं खूपखूप भाग्य की असा भाऊ आम्हाला लाभला. एक आदर्श भाऊ म्हणून आम्हा सर्व भिडे मंडळींतर्फे त्याला अभिवादन !

हार्दिक शुभेच्छा !

# रंजना साडी सेंटर

**२३६, भवानी पेठ, मारवाडी चौक,**
**सातारा**

---

Best Compliments From -

# Raj Medicals

"Parijat Complex" Pawri Naka
SATARA

---



**हार्दिक शुभेच्छा !**

मूळचे सडवे वृंदावन, रत्नागिरी येथील,
पुण्याचे लोकप्रीय ज्योतिषी
श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे
हस्तरेषा तज्ञ, पुणे (४६ वर्षांचा अनुभव)

दरवर्षी - जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर
गीता मंडळ, रत्नागिरी येथे.
फेब्रु., ऑगस्ट, नोव्हेंबर - सोलापूर येथे.
ठाणे येथे अपॉईंटमेंट घेऊन भेटतात.
गेली ३० वर्षेसातत्याने येत असतात.
भिडे कुलवंताना व माहेरवाशिणींना
फी मध्ये सवलत.


एक वेळ अवश्य भेटा, खरेखोटे अनुभवा, विवाह योग,
जीवन समस्या जाणून घ्या. (हस्तरेषेवरून)

**पुण्याचा पत्ता:**
**सहवास हौ. सोसा. ३३/१२, वडगाव बुद्रुक,**
**परिणय मंगल मागे, सिंहगड रोड, पुणे - ४१.**
**फोन नं. - २४३५०६२६, मोबा. नं. - ९३२५५५२७६५**

---

**आदरणीय**
**कै. बाबाराव भिडे**
**आणि**
**नरसिंह भिडे**
**यांच्या स्मृतीस**
**अभिवादन करून**
**भिडे संमेलनास**
**शुभेच्छा !**

श्रीमती वनिता नरसिंह भिडे
श्री. विवेक नरसिंह भिडे
श्री. विनय नरसिंह भिडे


कुबेर
सुवर्ण संचय योजना
आता बचतीबरोबर
थेट सोन्यात गुंतवणुक
फायदा बोनसचा आणि
सोन्याच्या भावाचा सुध्दा.
कुबेर योजनेत सामिल व्हा आणि दुहेरी फायदा मिळवा.
पु. ना. गाडगीळ
आणि सन्स
१८३२
• पुणे • चिंचवड • नाशिक • सातारा • मुंबई • सांगली • कोल्हापूर •
नाशिक : ०२५३-२५७१००१ सिंहगड रोड : ०२०-२४६१२१५१ सातारा रोड : ०२०-२४२१२४२२ चिंचवड : ०२०-२७३५३४४४-६
सातारा : ०२१६२-२३१०२२/२३ मुंबई : ०२२-२४३८५०१०/११
www.pngadgilandsons.com


With Best Compliments From
IQCS
IRQAO
NIKITA BOILERS
ISO 9001:2008 Company
(www.nikitaboilers.com)
(nikitaboilers@gmail.com)
Manufacturers of: -
- Steam Boilers
- Blowers
- Scrubbers
- Chimney
- Heat Exchangers
- Air Pollution Control Equipment for cemetery
Head Office: - 204, Harshavardhan, Raheja Township, Malad (East), Mumbai: - 400097, Tel: - 022-28771351.
Works: - C – 46, Sinnar-MIDC, Nashik: - 422103, Tel: - 02551-230039.

# आम्ही सूर्याची उष्णता पकडून कोंडून ठेवतो या उष्णतेला सूर्या - ७५ द्वारे कामाला लावतो



सूर्या - ७५
सौर निर्जलीकरण संयंत्र
पेटंट ॲप्लिकेशन पेंडिंग

पेशवाई
मसाले व खाद्यपदार्थ


















## जय गृह उद्योग

१११११/१, उत्तर शिवाजी नगर, कै. विष्णू विनायक भिडे मार्ग, (श्री गणपती गॅस गोडाऊन जवळ), सांगली - ४१६ ४१६
फोन : ०२३३-२३२१०१८/९९२१२४७३६२/९२०९२३७९५७ e-mail-peshwaimasale@gmail.com
Visit: www.peshwai.weebly.com




मे. बी. ए. काटदरे
२१४, सदाशिव पेठ (प्रतापगंज पेठ), सजावट फर्निचर समोर, सातारा - ४१५००२. फोन - ०२१६२-२८३२९५
शाखा : पोवई नाका, मराठे एजन्सीज् समोर, सातारा - ४१५००१. फोन - ०२१६२-२३६७५०

# रा. स्व. संघाचे प्रार्थनाकार कै. न. ना. भिडे यांची जन्मशताब्दी

दिलीप वासुदेव भिडे, (पुणे)
मोबा.९६५७५४१२३६



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ किंवा राष्ट्र सेविका समिती या संघटनेशी कधी ना कधी तरी आपला संबंध आला असेलच. मी सुद्धा संघाचा स्वयंसेवक आहे परंतु संघशाखा संपताना म्हटली जाणारी 'नमस्ते सदा वत्सले' ही प्रार्थना कोणी रचली हे माहीत नव्हते. यात आश्चर्य सुद्धा वाटत नाही. भिडे प्रतिष्ठानचे काम करीत असताना, दुसऱ्या कुलवृत्ताच्या आवृत्तीत विशेष व्यक्तिमत्त्व खंडामध्ये असलेली माहिती अगदी त्रोटक आहे परंतु प्रार्थनाकारांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे कार्य व बुद्धिमत्ता आपल्या परिवारापर्यंत पोहोचावी असे वाटते.

रा. स्व. संघ ही जगातील मोठी संघटना गेली अनेक वर्षे काश्मीर पासून कन्याकुमारी आणि सोमनाथ पासून तेजपूरपर्यंत पसरली आहे. संघाचा प्रसार होऊ लागला तेव्हा शाखा संपताना सर्वमान्य अशी एकच प्रार्थना असावी असा विचार पुढे आला. त्याच वेळेस नागपूरमध्ये १९२८ साली मोहिते शाखेचा, संस्कृतचा व्यासंग आणि प्रभुत्व असलेला, प्रचंड बुद्धिमत्तेचा एक स्वयंसेवक डॉ. हेडगेवार यांच्या नजरेत आला आणि डॉक्टरांचा निरोप मिळाल्यावर अवघ्या चारच तासात संस्कृतमधील अर्थबद्ध तयार केलेली प्रार्थना म्हणजेच 'नमस्ते सदा वत्सले' ही आहे. ही प्रार्थना ज्यांनी अवघ्या काही तासात बिनचूक रचली त्या महान कवीचे, महान संस्कृततज्ञाचे नाव म्हणजे आदरणीय नरहरि नारायण भिडे हे आहे. ही बाब संपूर्ण भिडे परिवाराला अभिमानास्पद आहे.

आदरणीय कै. न. ना. भिडे यांचा जन्म १९१३ साली नागपूर येथे झाला. एम.ए. बीटी., एम.एड. मध्ये प्रथम वर्गात नागपूर मध्ये शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर १९४४ च्या सुमारास नागपूरमधील इतवारी शाळेत संस्कृत, शास्त्र व गणित हे विषय शिकवीत असत. १९५६ साली वडिलांचे निधन झाल्यावर नागपूरची नोकरी सोडून आई पुण्यात असल्यामुळे नोकरीसाठी पुण्यात आले. परंतु एम.ए. एम.एड. सारख्या उच्च पदव्या असल्यामुळे आपण त्यांना शाळेत घेतल्यास नाकापेक्षा मोती जड नको या भीतीने पुण्यात नोकरीसाठी खूप फिरावे लागले. सरतेशेवटी बीएस.सी. बीएड. ला मिळणारे वेतन घेऊन त्यांनी पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल येथे नोकरीला सुरुवात केली. त्याच वेळेस त्यांनी जर्मन आणि फ्रेंच भाषेतील उच्च पदविकाही मिळविली. पुण्याच्या टिळक शिक्षण महाविद्यालयात प्राध्यापक म्हणूनही काम केले.

१९५६ साली पुण्यातील शाळेत त्यांनी संस्कृत हा विषय शिकविण्यास सुरुवात केली परंतु १९७३ च्या निवृत्तीपर्यंत पाच विद्यार्थ्यांना जगन्नाथ शंकरशेठ आणि चार विध्यार्थ्यांना बीडकर संस्कृत ह्या बोर्डाच्या अतिउच्च शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या. आजमितीस त्यांचे मार्गदर्शन लाभलेले अनेक विद्यार्थी देशात वा परदेशातसुद्धा अधिकारपदावर काम करीत आहेत.

भिडेसर मध्यम बांध्याचे, गोऱ्या वर्णाचे, तेजस्वी मुद्रेचे व अत्यंत शिस्तबद्ध जीवन पुण्यात जगले. त्यांच्यात शिस्तप्रियता हा गुण असल्यामुळे त्यांचे नित्याचे कार्यक्रमसुद्धा अगदी घड्याळाच्या काट्याप्रमाणे सुरू असत. भिडे सरांची दिनचर्या पहाटे ३ वाजता सुरू होत असे. त्यानंतर स्नान, प्रात:संध्या, नमस्कार, योगासने, धार्मिक दिनक्रम करून सकाळी ८ ते ११ या वेळेत विद्यार्थ्यांचे अध्ययन वर्ग घेत असत. दर एकादशीला सायकलवरून आळंदीस सुद्धा नेमाने जात असत.

देशामध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहत असतांना म्हणजेच १९४७–४८ साली संपूर्ण देशातून ''कर्मथिअरी, इट्स् ओरिजिन, नेचर, प्रूफ ॲन्ड इंप्लिकेशन'' या विषयावर संस्कृमधून निबंध मागविण्यात आले, त्यावेळेस भिडे सरांनी पाठविलेल्या निबंधास त्याकाळी ३६० रुपयांचे पारितोषिक मिळाले. त्यांचा तोच निबंध १९५० साली म्हैसूर विद्यापीठाने प्रसिद्ध केला होता.

''नमस्ते सदा वत्सले'' या प्रार्थनेबरोबर दिल्या जाणाऱ्या वीकिर, अर्धवृत, वामवृत, विश्रम, दक्ष, आरम इ. शाखेमध्ये किंवा संघात दिल्याजाणाऱ्या आज्ञा संस्कृतमधून तयार करण्याचे कामही भिडे सरांनीच केले आहे. संघाची ही प्रार्थना अतिशय बिनचूक होती. म्हणजे प. पू. डॉ. हेडगेवार यांनासुद्धा एकही चूक त्यामध्ये आढळली नाही. एकाच ओळीत जास्तीतजास्त शब्द बसावे याकरिता मंदारमाला वृत्तामध्ये एक अक्षर अधिक घालून नवीन केलेल्या वृत्ताच्या लक्षणांचा संस्कृत श्लोक तयारकरून ''मेघनिर्घोष'' म्हणजेच सध्या प्रचलित असलेले सुमंदारमाला वृत्त होय. आजपावेतो अनेक वर्षे होऊनसुद्धा संपूर्ण भारतात ही प्रार्थना रोजच्यारोज उच्चारली जाते. या प्रार्थनेसंदर्भात प. पू. गोळवलकर गुरुजी म्हणाले होते ही फक्त प्रार्थना नसून तिला मंत्राचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. म्हणून म्हणतांना एकही अक्षर इकडेतिकडे करता कामा नये. संघाच्या या प्रार्थनेत थोडा बदल करावा असे गोळवलकर गुरूजींनी सुचविले होते परंतु कालांतराने हा बदल न होताच ही प्रार्थना आजमितीलासुद्धा जशी आहे तशी म्हटली जाते. भिडे सरांनी प्रार्थना तयार केल्यानंतर नागपूरमध्ये ते असेपर्यंत काहीकाळ प्रत्येक शाखेवर जाऊन या प्रार्थनेचा अर्थसुद्धा भिडेसर स्वत: सांगत असत.

**पान नं. २९ वर पुढे चालू .....**

**"दोशी परिवार"**
**रमाचा गोट**
**सातारा**
**तर्फे**

**भिडे संमेलनास**
**हार्दिक शुभेच्छा !**

---

With Best Compliments From -

Proprietor : Shri Rajesh Mane

**Om Sai Constructions**
Mangalwar Peth, SATARA

---

'आम्ही भिडे' या अंकास हार्दिक शुभेच्छा !



## चित्रगुप्त भिडे

★ मेकप आर्टिस्ट व मॉडेल फोटोग्राफर
★ कलात्मक फोटो सेशन्स,
★ पोर्ट फोलिओ आणि भरतनाट्यम् व कथ्थक नृत्यासाठी मेकप सह फोटोग्राफी केली जाईल.
★ तसेच फोटो व जुन्या निगेटिव्हज् (३५ एमएम / १२० एमएम) स्कॅन करून मिळतील.
★ शास्त्रोक्त पद्धतीने तबला-वादन शिकविले जाईल.

**भेटा अगर लिहा**

चित्रगुप्त भिडे - 'विश्वजीत' बंगला, प्लॉट नं. ६,
सर्व्हेनं. ६७८, संत एकनाथ नगर-भाग२, बिबवेवाडी,
पुणे ४११०३७.
फोन - (०२०) २४४७९०९५ / (०२०) २४२११६२०
मोबाईल - ९८२२१ ९९०५७

---

With Best Compliments From -

## Majgaonkar
## Garage & Servicing Station

Repairing of all types of Two Wheeler
& Maruti Vehicles
Gas Kit Fitting for All Petrole Vehicles

## Majgaonkar
## Auto Consultant & Finance

*Sales And Service*
*All types of Four Wheelers Consultancy*

**Harshad Majgaonkar**
**Mo.:- 94224 03181**

452/A, Sadar Bazar, Opp. Pravin Classes, Satara.
Phone : 236807

# कविता

विजय अनंत भिडे (ठाणे)
९८३३०४५४६३

## 'वय'

ते वयच तसं असतं
खेळायचं भांडायचं
खायचं प्यायचं
केला तर अभ्यास, नाहीतर
मस्त झोपायचं
ते वयचं तसं . . . . .
कॉलेजात जायचं
मित्रमैत्रिणीत रमायचं
कॉलेज बुडवून
सिनेमाला जायचं
ते वयचं तसं . . . . .
ऐन तारुण्यात
अत्युच्च शिखरं असतं
लग्नानंतरचे काही दिवस
कोणी तिसरं नको असतं
ते वयच तसं . . . . .
बायका मुलात रमायचं
साहेबांचं ऐकायचं
संसारासाठी राबायचं
बैलाचं जीवन जगायचं
ते वयच तसं . . . . .
नातवंडांशी खेळत
मुलांशी जमवत
आठवणींच्या शिदोरीवर
म्हातारा म्हातारीनं

## 'सवय'

या डोंगर दऱ्यांचा कंटाळा आलाय
इमारती कारखाने बघायची
सवय आहे मला
शुद्ध हवेचा त्रास होतोय
अशुद्ध हवेची सवय आहे मला
या शांततेमुळे वेड लागेल
गर्दी गोंगाटाची सवय आहे मला
इथे सर्व प्रसन्न, तरीही अप्रसन्न वाटते
हा सवयीचा परिणाम वाटतो मला
स्वैर जीवन असूनही तुरुंग वाटतो इथे
शहरी कारावासाची सवय आहे मला.

---

**कै. न. ना. भिडे, पान नं. २७ वरून पुढे चालू . . . . .**

अथर्वशीर्ष या गणपती स्तोत्रावरसुद्धा भिडे सरांनी अभ्यास करून अथर्वशीर्ष आणि आधुनिक गणकयंत्र यांचा घनिष्ठ संबंध आहे या शिवाय स्तोत्रातील गणकऋषी आणि गं हा धातू वैश्विक ज्ञानाची प्राप्ती करून देणारी गणपतीची उपासना म्हणजेच वैश्विक ज्ञानाची उपासना आहे. या स्तोत्राचा उपासक प्रज्ञावान होतो हे सूत्रशास्त्रानुसार त्यांनी सांगितले. हा भिडे सरांचा अनुभव वेदवाङ्मय अभ्यासकाला प्रेरक व उपयुक्त ठरला आहे. या शिवाय ज्ञान, विज्ञान व अज्ञान तसेच वेद, देव, वर्ण म्हणजे काय ? आजची शास्त्र व योगशास्त्र याबद्दलचे सरांचे वाङ्मयीन विचार त्यांनी लिहून ठेवलेले आहेत. नागपूरचे प्रकांड पंडित महामहोपाध्याय, महान वक्ते श्री. वाळशास्त्री हरदास विश्वकोषाबद्दल व्याख्यान देण्या अगोदर तो विषय भिडे सरांकडून पूर्ण समजावून घेत असत. कारण भिडे सरांचा वैदिक शास्त्रे, विज्ञान, व्याकरण, छंद, सौंदर्य, लय, ध्वनी, मंत्र इत्यादी शास्त्रांचा व्यासंग अफाट होता. या बरोबरच ते संस्कृत बरोबर हिंदी व इंग्रजी वरील प्रभुत्त्व म्हणजे बहुभाषा कोविदच होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

कोणत्याही व्यक्तीची महती, त्याचे विचार आणि त्याचा सामाजिक प्रभाव यावर अवलंबून असते. त्यादृष्टीने भिडे सरांचे जीवन कृतार्थ झाले. शुद्ध चारित्र्य, अचाट बुद्धिमत्ता, आत्मविश्वास या व्यक्तिविशेषांबरोबरच शिस्त, निरलसता, विनयशीलता, निस्पृहता आणि निर्भिडपणा या गुणांनी आपले व्यक्तिमत्त्व विकसित केले.

रा. स्व. संघाचे प्रार्थनाकार आणि संस्कृतचे प्रकांड पंडित आदरणीय न. ना. भिडे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी दुःखद निधन झाले. आपले संपूर्ण जीवन समाज प्रबोधन, चारित्र्यसंपन्न विद्यार्थ्यांची निर्मिती, अध्यापन यासाठी वाहून घेतले. अशा भिडे कुळात जन्म घेतलेल्या पुरुषोत्तमास भिडे परिवारातर्फे त्रिवार वंदन.

आदरणीय कै. न. ना. भिडे यांच्याबद्दल लिखाणाकरिता भिडे सरांचे नातू श्री. नंदन यांनी त्यांच्याबद्दलचे लिखाण आणि फोटो उपलब्ध करून दिला. त्याचप्रमाणे जन्मशताब्दी निमित्त भिडे सरांच्या आठवणींचा एक संग्रह ग्रंथ प्रकाशित होण्याकरिता एक कुलबंधू श्री. शरदराव भिडे हे खूप प्रयत्नशील आहेत. या दोघांचे मी भिडे प्रतिष्ठानच्या वतीने आभार मानतो !

**मोबा. ९६५७५४१२३६**

**संदर्भ – (व्यक्ती वाङ्मय व विचार आणि रा. स्व. संघाची ६० वर्षे)**

---

## भिडे प्रतिष्ठानला अर्थसहाय्य करण्याचा मार्ग सुलभ

आपणास भिडे प्रतिष्ठानला अर्थसहाय्य करण्यासाठी चेक पाठविताना त्याचे पोस्टेज, कमिशन इत्यादी कटकटीचे वाटते. आता दि ठाणे जनता सहकारी बँक, सदाशिव पेठ शाखा येथे कोअर बँकिंग पद्धत सुरू झाली आहे. त्यामुळे आपण या बँकेमध्ये भारतात वा भारताबाहेरून **RTGS Code No. TJSB 0000018** या नंबर द्वारे **खाते क्र. १२९४** मध्ये पैसे भरा. पैसे भरल्याची नोंद अथवा पावती आपण खालील व्यक्तींकडे पाठविल्यास नोंदीची पडताळणी करून आपणांस प्रतिष्ठानकडून रीतसर पावती मिळेल याची नोंद घ्यावी. १) दिलीप भिडे - ९६५७५४१२३६, पुणे २) माधव भिडे -९७६३७२७६८८ - पुणे ३) कुमार भिडे -९८२२०८५३८२ - सांगली ४) चिंतामणी भिडे -९९३०५०८५०६- ठाणे

भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !

# हर्ष प्रॉडक्टस्

कोल्हापूर, सांगली, सातारा, गोवा,
रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी
आयुर्वेदिक औषधांचे वितरक

२६६७, अे वॉर्ड, हृदयनाथ प्लाझा, बिनखांबी गणेश मंदिराजवळ,
**कोल्हापूर - ४१६ ०१२**
- संपर्क -
दूरध्वनी - ०२३१-२६२३५०५, २६२३५०६, मोबा. : ९४२२४२८१९३

**प्रोप्रायटर - प्रदीप भिडे**

# शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा



दरवर्षीप्रमाणे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आणि वनराई संस्थेच्या सहकार्याने जनहिताचे निस्वार्थी व महाराष्ट्राचे पहिले माजी मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांचे जीवन, कार्य व विचार या विषयावर आधारित ४० शाळांमध्ये १२०० विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा घेण्यात आल्या. एकंदर २४ शाळांनी सहभागी होऊन सोयिस्कर तारखांना परीक्षा घेऊन ७८७ प्रश्नपत्रिका प्रतिष्ठानकडे तपासणी करिता पाठविल्या. ऑगस्टमध्ये सर्वश्री इसाळ, कदम, सरनाईक आणि भिडे यांनी त्या तपासून त्यांपैकी शाळावार गुणानुक्रमे पहिल्या १० टक्के प्रश्नपत्रिका समीक्षणा करिता (Moderation) निवडल्या. पहिले तीन गुणानुक्रम काढण्यासाठी भिडे प्रतिष्ठानकडून फेरतपासणी प्रमुख सौ. उर्मिलाताई भिडे यांनी काम पाहिले. स्पर्धमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण १८ विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके व रोख पारितोषिके माजी जिल्हाधिकारी श्री. अजितराव निंबाळकर, भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे आणि वनराई संस्थेचे सचिव श्रीराम गोमरकर यांचे हस्ते देण्यात आली.

या कार्यक्रमाचे संयोजन दरवर्षीप्रमाणे भिडे प्रतिष्ठानकडून श्री. एस्. टी. भिडे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत श्री. शशिकुमार भिडे तर परीक्षकांचे मनोगत सौ. उर्मिलाताई भिडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हाधिकारी श्री. निंबाळकरसाहेब होते. श्री. मोरेश्वर परळीकर यांनी आभारप्रदर्शन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## कु. देविका शंतनू भिडे



टेबलटेनिसमध्ये अनेक पारितोषिके मिळवून अग्रमानांकन मिळविणारी उदयान्मुख खेळाडू कु. देविका शंतनु भिडे, पुणे हिने १९ वर्षाखालील गटामध्ये आणि राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धमध्ये दोन्ही मॅचेस जिंकून मानाचा करंडक मिळविला. या स्पर्धा अलिबाग येथे डिसेंबर २०१२ च्या पहिल्या आठवड्यात संपन्न झाल्या. कु. देविका ही भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांची नात आहे.

शालगर सर्व्हिसेस्
सर्व प्रकारचे फ्रिज, वॉशिंग मशीन
दुरुस्ती केंद्र
गोदरेज सर्व्हिस स्टेशन

८८/अ/१, शुक्रवार पेठ, आकार नगरी बेसमेंट,
कोटेश्वर मंदिराजवळ, **सातारा**
**फोन (०२१६२) २८२०९४**



**BEST WISHES FOR**
**BHIDE KUL SAMMELAN**
**From**
**Anand Wadadekar**
**Economist | Author | Career Counsellor**
**Faculty In-charge – SAMVIT**
**School of Infrastructure Business, Pune**
**(India's Only Dedicated I-School**
**for Infrastructure Business)**

**भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !**

**श्रीविनायक वैद्यकीय व्यावसायिकांची**
**सह. पतसंस्था मर्या., सातारा**

**श्री. अरुण कुलकर्णी**
**चेअरमन**
**डॉ. श्री. कैलास विभुते**
**व्हा. चेअरमन**
**सर्व संचालक मंडळ व स्टाफ**

२२७, शनिवार पेठ, दत्तकाशी हॉस्पिटल आवार,
देवी चौक, सातारा.
फोन नं. २३८४२८

**धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सातारा**

"धन्वंतरी भवन" १३, शनिवार पेठ, सातारा. फोन नं. ०२१६२-२३८३४१, २३६९५२
कार्यक्षेत्र - सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, नाशिक व पुणे हे सर्व जिल्हे
शाखा : - सातारा, कोरेगाव, फलटण, कराड, धनकवडी व पिंपरी-चिंचवड (पुणे)
website:- www.dhanvantaripatsanstha.com
Email&- dhanvantari_patsanstha@rediffmail.com

- संस्थेची ठळक वैशिष्ट्ये -

१) सातारा शाखेत वीज बील स्वीकृती
२) C.R.A.R.१९.७२% (निकष कमीतकमी ९%)
३) सभासदाचा प्रत्येकी १ लाखाचा अपघाती विमा
४) निव्वळ एन.पी.ए. - १.९४%
५) सभासदांना मोफत वाचनालय
६) २३ वर्षे सरासरी ९८.९९% कर्जवसुली
७) सुलभ व त्वरित सोने तारण कर्ज वितरण
८) सुरक्षित गुंतवणूक
९) सर्व कामकाज संगणकीकृत
१०) सर्व शाखा स्वमालकीच्या वास्तूत
११) प्रतिवर्षी लाभांश
१२) प्रशिक्षित, अनुभवी व सेवातत्पर सेवकवर्ग
१३) अल्पदरात भारतात कोणत्याही ठिकाणी
डी.डी. (चेक ॲट पार) सुविधा

**सरव्यवस्थापक, व्हा. चेअरमन, चेअरमन आणि संचालक मंडळातर्फे**
**भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !**

**Mob.:9850043027**
**9403547439**

# VIJAY
# SALES & SERVICES

Currency Counting Machine
Office Equipments
Home Security Systems, CC TV.
Digital Display Board

Off. :- 365, Ahire Colony, Degaon Road,
Addl. M.I.D.C., Satara - 415 004.
Ph. (02162)248383

# पारंपारिक मंगळागौरीचे खेळ



हा गौरव परंपरेचा
हा गौरव मांगल्याचा
हा गौरव स्त्री शक्तीचा
हा गौरव सौंदर्याचा

असे म्हणत २० ते २५ महिला मंचावर येतात आणि बघता बघता तबल्याच्या ठेक्यात व निरांजनाच्या मंद प्रकाशात पारंपारिक खेळाला सुरुवात करतात.

भारतीय संस्कृतीचा ठेवा जतन करणे हा यामागील उद्देश आहे. गेली १७ वर्षे सातारा येथील जागृती महिला मंडळाच्या अध्यक्षा व संस्थापिका सौ. सुमन श्रीपाद भिडे या साताऱ्यातील सौ. सुप्रिया भिडे, रागिणी जोशी, सुषमा भिडे, वैद्य आणि इतर महिलांच्या सहकार्याने जागृती मंडळाच्या वतीने असा जोशपूर्ण आणि आकर्षक कार्यक्रम निरपेक्षतेने करीत आहेत. सातारा जिल्ह्यात वाई, कऱ्हाड, उंब्रज, कोरेगाव यासह पुणे, मुंबई, दिल्ली म्हणजे फक्त भारतातच नाही तर भारताबाहेर म्हणजे महाराष्ट्र मंडळ दुबई येथे झालेल्या कार्यक्रमास प्रश्नोत्तरांची साद मिळून हा कार्यक्रम कौतुकास पात्र ठरला. झिम्म्याचा ताल, सुपाचा ठेका, फुगडीची गिरकी हे सर्व पाहताना दीड ते दोन तास कधी संपतात हे प्रेक्षकांना कळत नाही आणि कौतुकाने टाळ्या सतत वाजत असतात. जवळजवळ ३५ ते ४० मंगळागौरीचे पारंपारीक खेळ पारंपारिक पोषाखात सादर होतात. खेळामध्ये विविधता यावी याकरिता स्वरचित उखाणे, खेळाला साजेशी गाणी तबल्याच्या ठेक्यात व खंजिरीच्या तालात ती सादर होतात.

जागृती मंडळाच्या संस्थापिका सौ. सुमनताई भिडे सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून २७ वर्षे कार्यरत होत्या. १९९५ साली त्या निवृत्त झाल्या. शाळेत त्यांच्याकडे सांस्कृतिक, सहल, गाईड असे विविध विभाग होते. साहजिकच या विभागातील कामाचा अनुभव त्यांना निवृत्तीनंतरच्या कामातसुद्धा उपयोगी ठरला. मंगळागौरीच्या खेळांच्या माध्यमातून त्या रसिकांची सेवा करीत आहेत. तसेच या व्यतिरिक्त नाममात्र शुल्क घेऊन घरच्याघरी वधू-वर सूचक मंडळ सुद्धा चालवितात आणि सध्या चर्चेत असलेल्या स्त्रीभ्रूण हत्या, लेक वाचवा मोहीम या उपक्रमाच्या माध्यमातून समाजाला सतत जागरूक ठेवण्याचे कार्य करणाऱ्या जागृती मंडळाचा कार्यक्रम आपण भिडे कुलसंमेलन सातारा येथे सादर करतो आहे तो अवश्य बघावा म्हणजे त्याची लोकप्रीयता कळेल. कोणत्याही यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री उभी असते परंतू मला यश मिळावे याकरिता माझे पती म्हणजे श्रीपादरावांची कायम धडपड सुरू असते हे त्या आवर्जून सांगतात.

सौ. सुमनताईंच्या कार्यक्रमात सहभागी असलेली एक भगिनी उखाण्यातून आपल्या भावना थोडक्यात सांगते आहे.

* आमच्या भिडेबाईंनी घेतलाय महिला जागृतीचा वसा,
  आमच्या मनावरसुद्धा उमटलाय तोच ठसा.
* रागिणी, सुप्रिया, सुषमा, विद्या गोफ विणताना नाही ठेवत कसर । वाळिंबे वहिनींच्या भारुडाची नाही येणार कुणाला सर ।
* रश्मी-वीणाची बघावी फुगडी, स्मीता मावाची आहे जोडी ।
* तिघी अश्विनींचा पिंगा, व्यायाम देई सर्व अंगाला ।
  तर आपटे आणि मराठेंचा आहे आकाशी बंगला ।
* रेखा-सीमा यांचा आहे कोंबडा, तर फडणीस वहिनींचा
  बघावा काच-किरडा ।
* लाटणे, सूप, झिम्मा अशा अनेक खेळात रात्र जाते सरून,
  आणि सगळ्या मिळून खेळताना मोठेपण जातो विसरून ।
* श्रावण महिना जवळ आला की आमच्या कानात वाजू
  लागतो मंगळागौरीच्या खेळाचा अलार्म, आणि
  विवेकरावांचे नाव घेऊन विशाखा करते तुम्हा सर्वांना


## जागृती महिला मंडळ

।। पारंपारिक खेळातून संस्कृति संवर्धन ।।

अध्यक्षा : सौ. सुमन श्रीपाद भिडे

फोन : (०२१६२) २८०४४५

उपक्रम :

* मंगळा गौरीचे पारंपारिक खेळ, भारुडे व जोगवा
* सर्व प्रकारचे रांगोळी वर्ग
* सांस्कृतिक उपक्रमात सहभाग

'यशोधन', १५२, चिमणपुरा,
सातारा - ४१५ ००२ (महाराष्ट्र)

# सर्व गणेश भक्तांसाठी सुवर्णसंधी !

## श्री गणेश कला केंद्र



आमचे येथे १०० टक्के शाडूमातीच्या, शास्त्रशुद्ध गणेश मूर्ती उपलब्ध आहेत. आपला गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शास्त्रशुद्ध साजरा करण्यासाठी गणेशमूर्तींची मागणी आजच नोंदवा.

**श्री. आदित्य सतीश भिडे**

**स्थानिक संपर्क : ८८०५० २६६३०, ७५८८० २३६१६**

गुरुप्रसाद, श्री स्वामी समर्थ सोसा. घर क्र. १४, श्रीधरनगर, धनकवडी, पुणे - ४३.
१६९७, सदाशिव पेठ, खजिना विहीर चौक, पुणे - ४११ ०३०

---

# *Satish Bhide*

**Investment Consultants, Estate Agent, Financial & Placement Services**

Ph. (0)020-2447 2316, R 24354353 Mob. : 98220 48661 E-Mail : bhidesatish@yahoo.co.in

# Savita Bhide & Co.

**Our Times Is Yours ! Call on us for :**

***Insurance *Mutual Funds/Loans/Company Deposits & Bonds *Sales/Purchase of Flat/Offices/Plots *Computation of I-Tax *Filling of I-Tax Return**

1697, Sadashiv Peth, Khajina Vihir Chowk,
Near Shailesh Raswanti Gruha, Pune 30.

# देशभक्त शंकर विष्णू तथा बाबूराव भिडे

**शरद शंकर भिडे, सांगली**



सातारा येथे होणाऱ्या भिडे कुल संमेलनाच्या निमित्ताने 'आम्ही भिडे' च्या १४ व्या अंकात साताऱ्याचे सुपुत्र थोर देशभक्त व स्वातंत्र्य सैनिक कै. बाबूराव भिडे यांच्या कार्यकर्तृत्वाची नव्या पिढीला ओळख व्हावी म्हणून हा लेखप्रपंच !

कै. बाबूराव भिडे यांचा जन्म १५ फेब्रुवारी १८९९ साली सातारा येथे झाला. त्यांचे वडील कै. विष्णू बळवंत भिडे हे साताऱ्यातील प्रसिद्ध डॉक्टर, समाजसेवी व राष्ट्रीय पक्षाचे काम करणारे लो. टिळकांचे कट्टर अनुयायी होते. त्यांचे निधन तसे अकालीच झाले. घरामध्ये दैन्यावस्था असताना व वडिलांचा आधार नसतानाही मिठाच्या सत्याग्रहात उडी घेऊन तुरुंगवास व देहदंड सोसण्याचे धैर्य कै. बाबूराव भिडे यांच्याप्रमाणे साताऱ्यातील अनेक तरुणांनी त्याकाळी दाखविले होते.

कै. बाबुरावांचे शिक्षण सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे झाले. गुरुवर्य सीतारामपंत देवधर हे शालाप्रमुख होते. त्यांचे ते आवडते विद्यार्थी होते. स्वराज्यप्रेम, स्वावलंबन, स्वाभिमान व देशभक्ती यांचे धडे गुरुवर्यांकडूनच त्यांना मिळाले. मॅट्रिकची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर पदवीचे शिक्षणासाठी पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रविष्ट झाले. कॉलेजच्या वसतीगृहात राहून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मुंबईच्या लॉ कॉलेजमध्ये कायद्याची पदवी घेण्यासाठी गेले. दादर येथील छबिलदास हायस्कूलमध्ये अर्धवेळ शिक्षकाची नोकरी करून एल्. एल्. बी.चे शिक्षण पूर्ण केले. वडिलांच्या मृत्यूनंतर आईसह चार भाऊ व दोन बहिणी एवढा मोठा कुटुंबाचा भार त्यांच्यावर पडला. हा भार कुशलतेने पेलताना त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला.


लोकमान्यांच्या मृत्यू नंतर म. गांधींकडे कॉंग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीचे नेतृत्व आले. म. गांधींच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात त्यांना एकूण ४ वेळा तुरुंगवास भोगावा लागला. २२ एप्रिल १९३० ला राजवाड्यासमोर झालेल्या मिठाच्या सत्याग्रहातील पहिले सत्याग्रही म्हणून त्यांना अटक झाली. पुढे आणखी दोन वेळा कायदेभंगाच्या चळवळीत तुरुंगवास झाला. १९४२ मध्ये 'चलेजाव' आंदोलनात भाग घेतल्याबद्दल १४ महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९२३ साली वकिली सुरू केली तरी चळवळी मधील सहभागामुळे तिकडे फारसे लक्ष नव्हते. त्यातूनही कित्येक स्वातंत्र्य सैनिकांच्या केसेस त्यांनी विनामूल्य चालविल्या. यावेळी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने त्यांनी खेडोपाडी कॉंग्रेसचा प्रचार केला. इंग्रजांच्या जुलमी राजवटीवर ते कडाडून टीका करत. त्यांच्या प्रखर वक्तृत्वामुळे त्यांना 'मुलुख मैदान तोफ' असे म्हणत. साताऱ्यातील त्यांचे राजकीय गुरु कै. भाऊसाहेब सोमण यांच्या अनुपस्थितीत ते त्यांच्या 'प्रकाश' या दैनिकाचे संपादक म्हणून काम करत. विदेशी मालावर बहिष्कार, दारुबंदीचे आंदोलन यामध्येही ते सहभागी असत. सातारा नगरपरिषदेचे नगरसेवक म्हणून १० वर्षे त्यांनी काम केले. १९३७ साली सातारा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.

भारतीय स्वातंत्र्याची पहाट दिसू लागल्यावर त्यांनी आपल्या वकिलीच्या व्यवसायाकडे लक्ष दिले. १९४६ ते १९५७ या काळात ते जिल्हा कोर्टात सरकारी वकील होते. सातारा नगर वाचनालयाचे अध्यक्ष म्हणून ६ वर्षे काम पाहिले. १५ ऑगस्ट १९७२ रोजी स्वातंत्र्यसंग्रामातील त्यांच्या कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना ताम्रपट देऊन गौरविले. त्याच वेळी सक्रीय राजकारणामधून त्यांनी निवृत्ती स्वीकारली. १९७३ मध्ये त्यांच्या वकिलीच्या व्यवसायास ५० वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांनी तेही काम थांबविले.

त्यांच्या इतक्या व्यस्त अशा राजकीय व सामाजिक उपक्रमामधून संसाराकडेही त्यांनी उत्तम लक्ष दिले. पत्नी व ५ मुले याना काहीही कमी पडू दिले नाही. त्यांना साध्या सुपारीच्या खांडाचेही व्यसन नव्हते. खादीचे जाडेभरडे कपडेच आयुष्यभर त्यांनी वापरले. आहारात कमालीचा संयम होता. शिस्त अशी की आमच्या मनात त्यांचे विषयी भीतियुक्त आदर होता. आमच्या अडचणींच्या वेळी आम्हाला त्यांचे मार्गदर्शन लाभत असे. ११ जानेवारी १९७७ रोजी त्यांचे निधन झाले. आम्हा भिडे कुटुंबियांना व कितीतरी त्यांच्या चाहत्यांना त्यांचे जीवन, त्यांची स्मृती कायम पवित्र प्रेरणादायी वाटत राहिली आहे.

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीमधील एका ध्येयवेड्या सत्याग्रही स्वातंत्र्यसैनिकाचे स्मरण साताऱ्यातील 'आम्ही भिडे' च्या अंकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने करावेसे वाटले. आजही त्यांचे जन्मस्थान ७२, भवानी पेठ ही साताऱ्यातील वास्तू त्यांची निरंतर आठवण देत आहे.

## भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !



# आर. जी. ज्वेलर्स

**चोख सोने-चांदी व अद्ययावत दागिन्यांचे दालन**

पंचमुखी प्लाझा, गाळा नं. १, १४९, सदाशिव पेठ,

श्री पंचमुखी गणेश मंदिरासमोर, सातारा

प्रोप्रा. राहुल घाडगे मो. ९९२२८९९९९८

# आवाहन

**९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे आश्रयदाता – रु. १०,०००/– हितचिंतक रु. ५,०००/– आजीव सभासद रु. १,०००/– हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुषंगे खालील निर्णय घेण्यात आला ''जे सभासद १०० रुपये भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घ्यावे.'' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.**

# जावे पूर्वेकडील देशा

**सुधीर केशव भिडे, पुणे**
मोबा.९७६५३८३९५६



मराठी शाळेत दुसरीत असताना, चित्रलीला निकेतन महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत निवड झालेले चित्र महाविद्यालयामार्फत जपानला पाठविण्यात आले आणि तेव्हापासूनच सौरभ भिडेला जपानचे आकर्षण वाटू लागले व ते इतके वाढले की इंजिनियरिंग पदवी हातात पडल्यानंतर मास्टर्स करण्यासाठी अमेरिकेत वा पाश्चात्य देशात जाण्याची जी अनेकांना भुरळ पडते त्या ऐवजी त्याने ११ वी पासूनच जापनीज् शिकायला सुरुवात केली. त्याची त्या भाषेतील प्रगती व आवड लक्षात घेऊन त्याच्या इंडो-निप्पॉन फ्रेंडशिप असोसिएशनच्या क्लासच्या राठोड सरांनी जपानी भाषेच्या प्रोफिशियन्सी टेस्टची तयारी करून घेतली व पी. व्ही. जी. इंजिनियरिंग कॉलेज मधील अभ्यासाबरोबरच तीन परीक्षाही दिल्या. इंजिनियरिंगचे शिक्षण संपताच कॅंपस इंटरव्ह्यूमध्ये टाटा टेक्नॉलॉजीझमध्ये नोकरीही मिळली.

जपानी भाषा शिकलो आहे हे मित्राना माहीत असल्याने एका मित्राने पॅनासोनिक कंपनीतर्फे दिल्या जाणाऱ्या स्कॉलरशिप बद्दल माहिती दिली. जपानमध्ये उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या भारतीयांसाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते. माहिती मिळाल्यावर त्यासाठी प्रयत्न सुरु केले. दरवर्षी भारतातून दोघांनाच ही शिष्यवृत्ती दिली जाते.

या शिष्यवृत्तीसाठी यावर्षी ६१८६ अर्ज आले होते. अर्जा सोबत जोडलेली शैक्षणिक आलेखाची कागदपत्रं आणि जपानमध्ये उच्च शिक्षण घेण्याच्या उद्देशाला अनुसरून लिहिलेला निबंध पाहून ४३जणांना लेखी परीक्षेसाठी निवडण्यात आले. त्यानंतर ॲप्टिट्यूड टेस्ट घेतली गेली. त्यात घेतलेल्या मेकॅनिकल इंजिनियरिंगचे ज्ञानही पडताळून पाहण्यात आले. त्यानंतर त्यातून ८ विद्यार्थ्यांना अंतिम मुलाखतीसाठी दिल्लीला बोलावण्यात आले. मुलाखत घेणाऱ्या परीक्षकात कंपनीचे जपानमधील तीन, भारतातील एक आणि टेक्निकल् ज्ञान तपासण्यासाठी इंजिनियरिंगचे दोन प्राध्यापक असे सहाजण होते. अंतिम मुलाखतीत ४ विद्यार्थ्यांना निवडण्यात आले.

यासाठी जपानमधील ज्या विद्यापीठामध्ये मास्टर्स करायचे असेल तेथील प्राध्यापकांशी संपर्क साधून आपला विषय त्यांना सांगावा लागतो. त्यांच्याशी चर्चा करावी लागते व तेही या अंतिम मुलाखतीचे वेळी सांगावे लागते.

मार्च २०१३ अखेर सौरभ जपानला जाईल. इंडस्ट्रिअल रोबोटिक्स् या विषयावर तेथे संशोधन करून ऑगस्टमध्ये प्रवेश परीक्षा होईल व त्यानंतरच मास्टर्स च्या खऱ्या अभ्यासक्रमाला सुरुवात होईल . टोकियो इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे त्याचे पुढील शिक्षण होणार आहे.

# उगवत्या सूर्याच्या देशातील भारतीय जादुगार

सौ. तृप्ती आ. कवठेकर, पुणे

**मंजिल उन्हींको मिलती है, जिनके सपनों में जान होती है ।**
**पंखोंसे कुछ नहीं होता, हौसलों से उडान होती हैं ।**

कोणताही स्टेज शो करताना प्रेक्षकांना रडवणे हे अवघड आहे. परंतु प्रयोगा दरम्यान सतत हसवीत ठेवून मनोरंजन करणे हे त्याहीपेक्षा अवघड आहे.

जादुगार हा शब्द येतो तेव्हा पी. सी. सरकार किंवा मुथ्थुकुडु ही नावे डोळ्यांसमोर येतात. तसेच जादुगाराची चित्रविचित्र वेषभूषा, उंच टोपी वहातात जादूची छडी ! लोकांच्या चेहऱ्यावर हास्य यावे त्यांचे मनोरंजन व्हावे यासाठी स्वत:ची बुद्धी योग्य पद्धतीने वापरून त्यांचे मनोरंजन व्हावे मग त्यासाठी लहान-थोर, गरीब-श्रीमंत, निरोगी-आजारी यांना सुद्धा हसविणारा, अचंबित करणारा आणि जीव ओतून कर्तृत्वाची झालर लावणारा जादुगार डोळ्यांसमोर येतो. परंतु हा जादुगार मात्र जादूटोणा, मंत्रतंत्र न करता आधुनिक काळातील केवळ आपले जादूच्या कलेतील कौशल्य पणाला लावणारा, मेकॅनिकल इंजिनियर असलेला, गेली सहा वर्षे जपानमध्ये इन्फोसिस सारख्या आय. टी. कंपनीत मोठ्या हुद्द्यावर दररोज १० ते १२ तास काम करणारा माझा भाऊ अमोल शशिकांत भिडे हे आहेत.




खरं तर नोकरीमध्ये दररोज १० ते १२ तासाच्या व्यस्ततेतूनसुद्धा एक छंद आणि विरंगुळा म्हणून आणि झटपट मनावरील ताण कमी करण्यासाठी समाजामध्ये अंधश्रद्धेविरुद्ध संदेश देण्याकरिता नोकरी करून उर्वरित वेळात जादूचे प्रयोग सादर करतो. जपानमध्ये वाढदिवस, पार्टीज्, लहान मुलांचे शो किंवा कॉर्पोरेट पार्टीमध्ये अमोलने आतापर्यंत २० ते २५ जादूचे प्रयोग केलेले आहेत. अमोल मितभाषी आहे परंतु सतत काहीतरी नवनवीन शोधण्याची त्याची प्रवृत्ती त्याला कायम व्यस्त ठेवत असते. टोकियोमध्ये १४ नोव्हेंबर २०१२ ला झालेल्या बालदिनानिमित्त इंडियन इंटरनॅशनल स्कूल मध्ये ३ ते ५ वयोगटासाठी जादूची छडी घुमवून तेथील बालगोपाळ किंवा त्यांच्या पालकांना सुद्धा प्रयोगाचेवेळी मंत्रमुग्ध केले.

घरामध्ये आमचे वडील श्री. शशिकांत यांना जादूचे प्रयोग करून दाखविण्याची आवड होती. शिक्षणानंतर लगेचच नोकरी, घर यामुळे त्यांना कधी मोठ्या रंगमंचावर आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळाली नाही परंतु अमोलने मात्र या कलेत वयाच्या १० वर्षांपासून विशेष रुची घेऊन सुरुवातीला गंमत म्हणून आणि आता वयाच्या २५ नंतर मात्र व्यावसायिकतेच्या दृष्टीने २ ते ३ तासांचा स्टेज शो करण्यास जपानमध्ये सुरुवात केली. आपल्यामध्ये असलेली आंतरिक शक्ती, कौशल्ये आपले आयुष्य घडविण्यात गुंतवून टाकावी. आपण कल्पनाशक्तीचा विकास करु शकलो तरच यश मिळते. अमोलने जपानमधील काही निष्णात जादुगारांकडून प्रशिक्षण घेऊन, हातचलाखीने, कौशल्याने किंवा नजरबंदीने प्रेक्षकांना मोहित करता येईल यासाठी त्याचा विशेष प्रयत्न असतो. प्रॉडक्शन, लेव्हिटेशन, व्हॅनिश, ट्रान्स्पोझिशन, रिस्टोअर, मेंटल मॅजिक या विविध जादूच्या विभागामध्ये तो प्रवीण आहे. रोज १२ तास नोकरी करून घरी आल्यानंतर सुद्धा

कंटाळा न करता प्रयोगाचा सराव तो करतो. त्याची पत्नी सौ. भाग्यश्री सुद्धा प्रयोगाचा सराव करतांना त्यामधील गुणदोषांबद्दल बारकावे दुरुस्त करण्यास मदत करते किंवा खचित वडिलांशी पुण्यात सुद्धा फोनवर याबाबत चर्चा करून नवीन प्रयोग अधिकाधिक कसा चांगला होईल यासाठी त्याचा प्रयत्न विशेष कौतुकास्पद आहे.

साधा कागद जाळून त्याचे डॉलरच्या नोटेमध्ये रूपांतर करून १००० येन करून दाखविणे या प्रयोगाबाबत जपानमधील एका कॉर्पोरेट कंपनीच्या CEO ने सुद्धा त्याची पाठ थोपटली. लहानमुलांकरिता 'कँडी बुक' हा प्रयोग म्हणजे पुस्तकातील कँडीची चित्रे आधी दाखवून ''आबरा का डाबरा'' म्हटल्यावर त्यातून खरी कँडी बाहेर पडते व त्यानंतर पुस्तकातील कँडीची चित्रे गायब होतात हा प्रयोगतर जपानमध्ये मुलांनी डोक्यावरच घेतला. पत्त्यांच्या मॅजिकमध्येसुद्धा प्रेक्षकांनी निवडलेला पत्ता कॅटमधून अधांतरी उडतो किंवा प्रेक्षकांच्या मनातला पत्ता, तसेच पत्त्याचा विस्कटलेला कॅट पुन्हा त्या कॅटमधील सर्व पत्ते एका ओळीत आणून प्रेक्षकांच्या मनातील पत्ता ओळखणे या जादू प्रेक्षकांची दाद मिळवून देतात. सध्या त्याच्या जादूच्या पोतडीत १०० पेक्षा जास्त प्रयोग तयार आहेत.

या जादूच्या प्रयोगांमुळे त्याला जपानमध्ये एक नवीन ओळख प्राप्त झाली आहे. प्रेक्षकांना प्रयोगाच्या माध्यमातून खिळवून ठेवणे, समाजामध्ये काही व्यक्ती भोंदूबाबांच्या हातचलाखीवर विश्वास ठेवून बळी पडतात त्यांना हे केवळ नजरबंदी किंवा हातचलाखीमुळे शक्य होते म्हणून अंधश्रद्धेला बळी पडू नका हाच संदेश समाजामध्ये देऊन समाजात जागरुकता निर्माण करण्याचे कार्य तो करतो आहे. या व्यतिरिक्त या कलेचा उपयोग सामाजिक बांधिलकीच्या नात्याने समाजामध्ये वंचित, निराधार आणि आर्थिक पाठबळ न मिळाल्यामुळे अडचणीत असलेल्यांना मदत करण्यासाठी या प्रयोगादरम्यान मिळालेल्या मानधनाचा वापर करतो आणि ते आपले कर्तव्य आहे असे तो समजतो. अर्थात ही जाणीव आमचे घरामध्ये आई-वडिलांनी केलेल्या संस्कारामुळेच आहे हे विसरून चालणार नाही. भिडे प्रतिष्ठानचे श्री. दिलीप भिडे हे अमोलचे काका आहेत.

बर्गर आणि पिझ्झाच्या व फास्टफूडच्या जगात जपान व भारतीय मॅजिकच्या फ्यूजनची मेजवानी भिडे प्रतिष्ठानच्या एका कार्यक्रमात देण्याचा त्याचा मानस आहे. जपानमध्ये स्थित असलेल्या या भारतीय आणि भिडे कुलोत्पन्नाची नवीन ओळख देण्याचा हा प्रयत्न आपणांस जरूर आवडेल. त्याच्या या प्रयत्नासाठी सुयश चिंतून शुभेच्छा देते !

(९८९०६५६९७८/९६०४२४७७१९)

❖ ❖ ❖


भिडे संमेलनास
हार्दिक शुभेच्छा !

❖ ❖ ❖

प्रोप्रा. भागवत बंधू

**श्री गजानन प्रेस**
**७६, चिमणपुरा, सातारा**

भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !



**१) कॉन्ट्रॅक्टर्स ॲन्ड बिल्डर्स**
**२) कन्स्ट्रक्शन व वॉटरप्रुफिंग केमिकल्स्**
**३) सिंटेक्स् वॉटर टॅक्स् एजन्सी**
**४) सिसिटीव्ही / सिक्युरिटी सिस्टिम्स्**

**ओंकार वि. पंडीत**

''वनकादित्य'', ४००, सोमवार पेठ,
सातारा

# दिवाळी अंकाच्या निमित्ताने

प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली
मोबा. ९८९२५६३१५४

दरवर्षी दिवाळी जवळ आली की मुलांचा व मोठ्यांचासुद्धा उत्साह ओसंडून वाहू लागतो. महागाई कितीही झाली तरी दिवाळीला खरेदी ही होतेच. अशाच खरेदीमध्ये कपडे व मिठाईच्या बरोबर वर्तमानपत्राच्या स्टॉलवरील दिवाळी अंक दिसू लागतात.बहुतेक सुशिक्षित व मध्यमवर्गीय घरात एखाददुसरा अंक घेतात. किंवा दिवाळीला वाचनालयातून आणून वाचतात. दिवाळी अंक हे आता आपल्या संस्कृतीचे एक अविभाज्य अंग झाले आहे. साहजिकच खपाच्या दृष्टीने एक हजार रुपयात ५ ते ७ अंक व त्यावर एखादे दुसरे चांगले पुस्तक बक्षीस म्हणून द्यायची फॅशनच पडली आहे. अशा अनेक जाहिराती वृत्तपत्रातून येतात त्याला चांगला प्रतिसाद मिळतो असे हल्ली दिसते.

मग मनात येते की आपल्याला मशरूमसारखे दिवाळीपुरते दिसणारे दिवाळी अंक केव्हा सुरू झाले ? आपण तर आपल्या लहानपणापासूनच ते बघत व वाचत मोठे झालो.

या दिवाळी अंकांची कहाणी सुरू होण्यास कारणीभूत झाले एक मासिक. त्याचे नांव आहे 'मासिक मनोरंजन'. हे मासिक सुरू केले काशिनाथ रघुनाथ मित्र (आजगावकर) यांनी. ते सावंतवाडी येथे रहात होते. त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे त्यांचे मराठी शिक्षण पूर्ण झाले व ते शिक्षक म्हणून काम करू लागले. पण ते अतिशय उद्यमशील होते. त्यांना उपजत तीव्र बुद्धिमत्ता, चौकसपणा, जिज्ञासा, ज्ञानार्जनाची विलक्षण तळमळ होती. तसेच ते धाडसी होते. या त्यांच्या विविध गुणांमुळे त्यांना कोकणात चैन पडेना. त्यावेळी उद्योगी माणसासाठी कर्मभूमी होती मुंबई.

साहजिकच शिक्षकी सोडून काशिनाथपंतांनी मुंबईची वाट धरली. मुंबईला आल्यावर काय व्यवसाय करावा याचा ते विचार करू लागले. त्यांना वाचनाची आवड असल्याने त्या संबंधीचा व्यवसाय करावा असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्यांची वाङ्मयविषयक तीव्र तळमळ त्यांना त्या प्रकारचा उद्योग करण्यास कारणीभूत झाली. त्यांनी थोड्याच अवकाशात साधारण १८९५ सालच्या सुमारास 'मासिक मनोरंजन' या नावाने मासिक सुरू केले.

त्यावेळी करमणूक व ज्ञानार्जन यासाठी आजच्यासारखी साधने उपलब्ध नव्हती. तसेच मनोरंजन हे आपल्या मासिकाला योजलेले नाव नियतकालिकाच्या इतिहासात नवीन नव्हते. त्यापूर्वी बरीच वर्षे आधी मनोरंजन व निबंधपत्रिका या नावाचे मासिक पुण्याहून प्रसिद्ध होत असे. पुण्याचे त्यावेळचे सुप्रसिद्ध विद्वान श्री. गोविंद वासुदेव कानिटकर व त्यांची विदुषी पत्नी सौ. काशीबाई कानिटकर यांचा या मासिकात लेखनात व संपादनात सिंहाचा वाटा असे. इतकेच नव्हे तर मराठीतील पहिले प्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे हे ही लेखन सहाय्य करीत. त्यांच्या अनेक प्रसिद्ध कादंबऱ्या अंशत: यातून प्रसिद्ध होत असत. हरिभाऊंची 'गणपतराव' ही आजकालच्या गोष्टीमधील प्रसिद्ध कादंबरी व नाटके या मासिकात प्रसिद्ध झाली आहेत. तसेच काशीताईंच्या कादंबऱ्या व लेख यातून प्रसिद्ध होत असत. हरिभाऊ आपटे यांचे पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकावर अत्यंत प्रेम व जाज्वल्य अभिमान होता. पण व्यवहाराचे गणित न जमल्यामुळे थोड्याच दिवसात ते मासिक बंद पडले.

पुढे काही वर्षांनी ते नाव घेऊन काशिनाथ रघुनाथ मित्रांनी 'मनोरंजन' हे मासिक सुरू केले. संपादक काशिनाथ मित्र हे अतिशय प्रागतिक विचाराचे गृहस्थ होते. साहजिकच अनेक प्रागतिक विचारांच्या लेखकांना गळ घालून त्यांचे लेख त्यामधून प्रसिद्ध करू लागले. नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे तर या मासिकाचे दैवत होते. त्या वेळचे प्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरी तसेच प्रसिद्ध कथाकार विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या अनेक कथा व कविता मनोरंजन मासिकातून प्रसिद्ध होऊ लागल्या. एक प्रागतिक विचाराचे मासिक म्हणून मनोरंजनचा बोलबाला झाला.

या मासिकात ज्ञानार्जनाबरोबर विनोदी लेख, चुटके, नामांकित कवींच्या कविता या मासिकातून प्रसिद्ध होऊ लागल्या. विशेषत: त्यावेळचे प्रसिद्ध कवी, लेखक कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या कविता या मासिकातून प्रसिद्ध होऊ लागल्या. यांनीच पुढे सार्थ ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरीवर टीका लिहिली. तसेच प्रसिद्ध बंगाली लेखकांच्या व गुजराती लेखकांच्या कादंबऱ्यांची भाषांतरे करून ती मासिक मनोरंजनमध्ये देऊन प्रकाशित करण्यास सुरुवात झाली. थोड्याच अवधीत मनोरंजन हे नाव मराठीमुलखात सर्वतोपरी झाले. कारण त्यात विषयांची विविधता तर होतीच पण त्याच बरोबर कादंबऱ्या, प्रवासवर्णने, शास्त्रीय माहिती, विनोदी व ज्ञानप्रद चुटके, छोटीमोठी काव्ये असा सर्वांना आवडणार मजकूर ठासून भरलेला असे.

त्यावेळी मराठीत तीनच मासिके निघत असत. एक होतं 'विविध ज्ञान विस्तार' ते बहुधा गंभीर व सामान्य लोकांच्या डोक्यावरून जाणाऱ्या अनाकर्षक विषयांना वाहिलेले. दुसरे बेळगावहून निघणारे 'लोकमित्र' त्याची छपाई व बाह्यांग अगदीच सामान्य असे. लेखही सुमार मजकुराचे असत. शिवाय जळगावहून काव्य रत्नावली सर्वस्वी कवितेला वाहिलेले, हे ही सामान्य जनतेत प्रिय झाले नाही. अशा परिस्थितीत अंत:बाह्यांतर्गत प्रगतीपर असलेले 'मनोरंजन' अत्यंत लोकप्रिय

व्हावे यात नवल नव्हते.

श्रीयुत मित्र हे अत्यंत कल्पक संपादक व संयोजक होते. त्यांनी आपले मासिक अधिकाधिक लोकप्रिय कसे होईल व त्याला सर्वश्रेष्ठ प्रतिष्ठा कशी प्राप्त होईल, तसेच सर्व नामांकित लेखकांचे लेखन सहाय्य कसे मिळविता येईल याकरिता अनेक प्रयत्न सुरू केले. त्यातूनच त्यांनी पुस्तकाच्या बक्षिसाची योजना अमलात आणली. वास्तविक त्या वेळी मनोरंजन मासिक व्यवस्थित सुरू झाले होते पण जास्त वर्गणीदार मिळविण्यासाठी जो वार्षिक वर्गणी एकदम भरेल त्याला आकर्षक पुस्तक भेट मिळे. तेवढ्याकरिता ते अनेक लेखकांकडून पुस्तके लिहून घेत किंवा जुनी चांगली पुस्तके प्रकाशित करून वर्गणीदारांना भेट देत असत. पुढे ते छोट्या पुस्तकाऐवजी मोठी पुस्तके भेट देऊ लागले. साहजिकच मनोरंजन मासिकाचे वर्गणीदार वाढू लागले. त्यांनी वर्गणीदारांना पुस्तक भेट योजनेत न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई रानडे यांचे प्रसिद्ध पुस्तक 'आमच्या जीवनातील काही आठवणी' हे ही होते. आज दूरदर्शनवर दिसणारी 'उंच माझा झोका' ही मालिका यापुस्तकावर आधारित आहे. वर्गणीदार वाढल्यामुळे मित्रांनाही हुरूप आला. पुढे ते महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या आत्मवृत्तासारखी संग्राह्य व प्रसिद्ध पुस्तके विनामूल्य भेट देऊ लागले. त्यासाठी त्यांनी मनोरंजन छापखाना सुरू केला.

याच पुस्तकाबरोबर १९०९ साली काशिनाथ मित्रांनी दिवाळीच्या निमित्ताने विविध लेखकांकडून नवीन व विविध विषयांवर लेख लिहून त्यांचा एक विशेष अंक प्रकाशित केला व आपल्या वर्गणीदार सभासदांना भेट दिला. ही त्यांची योजना अत्यंत यशस्वी ठरली व लोकप्रिय झाली. पुढे ते दरवर्षी दिवाळीला विशेष अंक काढून भेट देऊ लागले. अशा प्रकारे आजच्या दिवाळी अंकाची सुरुवात झाली. पुढे दिवाळी निमित्त अनेक लोक सुंदर सुंदर अंक प्रसिद्ध करू लागले. त्यानंतर विविध वृत्तपत्रेही दिवाळी अंक काढू लागली. त्यामध्ये नामवंत चित्रकारांकडून मुखपृष्ठ व आतील चित्रे, अनेक लेखकांकडून लेख, माहिती, कविता, कादंबऱ्या प्रकाशित होतात. साहजिकच दिवाळी अंकात लहानापासून थोरांपर्यंत प्रत्येकाला काहीनाकाही वाचनीय साहित्य मिळते. नंतर काही अंक तर मुलांसाठी निघू लागले. आता दरवर्षी ३५०/४०० दिवाळी अंक निघतात. त्याला २००९ साली शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त अनेक लेख लिहिले गेले. सुरुवातीला दिवाळी अंकांची किंमत एक रुपया होती. ती वाढत वाढत आता शंभर रुपये झाली आहे.

मात्र अशा या दिवाळी अंकाच्या कहाणीला सुरुवात १९०९ च्या दिवाळीला झाली व त्या योजनेचे शिल्पकार ठरले काशिनाथ रघुनाथ मित्र व त्यांचे मासिक मनोरंजन !

पुढे काशिनाथ मित्र १९२५ सालच्या सुमारास कर्करोगाने वारले. त्यांनी आपल्या अनेक मित्रांना मासिक चालविण्या संबंधी लिहिले पण ते दुर्दैवाने ते बंद झाले.

पण आजच्या अनेक दिवाळी अंकांच्या रूपाने त्यांची व मासिक मनोरंजनाची आठवण येते. अशी ही साठाउत्तराची कहाणी पांचा उत्तरी सफळ संपूर्ण झाली. दरवर्षी निघणारे दिवाळी अंक ही एक प्रकारे प्रागतिक आणि भविष्यवेत्ता काशिनाथ रघुनाथ मित्रांना आदरांजली आहे असे वाटते. अशी ही शंभर वर्षांची सांस्कृतिक परंपरा साक्षर रसिकतेचे प्रतीक आहे ते आपण जपूयां.

# भिडे दांपत्याचा सत्कार



यवतमाळमधील पांढरकवडा तालुक्यातील पाटणबोरी गावात आदिवासी मुलींसाठी वसतिगृह उभारण्यासाठी मदत करणाऱ्या श्री.दिलीप व सौ. रेखा भिडे या दांपत्याचा जाणीव व वंचित विकास संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला.

# 'आम्ही भिडे' अंक १३ चा प्रकाशन समारंभ



दि. १४ ऑक्टोबर २०१२ रोजी 'आम्ही भिडे' च्या १३ व्या अंकाचे प्रकाशन 'हितवर्धिनी सभा' ठाणे येथे भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. माधवराव चिं. भिडे यांचे हस्ते झाले. या प्रसंगी श्री. चिंतामणि भिडे, ठाणे यांनी प्रास्ताविक केले. 'आम्ही भिडे' अंकाच्या माध्यमातून वेगवेगळे लेख, कविता, उल्लेखनीय कामगिरी याबाबत वेळोवेळी माहिती देऊन संवाद साधावा असे श्री. प्रभाकर भिडे (डोंबिवली) यांनी सांगितले. अंकाबद्दल विवेचन करताना अंक अधिक आकर्षक व वाचनीय होण्याकरिता आपल्या सूचना, कुटुंबातील कौतुकाचे प्रसंग, अन्य माहिती लिहून पाठविताना कोणतीही काटकसर न करता सढळ हाताने त्या पोच कराव्यात असे श्री. दिलीप भिडे, पुणे यांनी सांगितले. तसेच प्रतिष्ठानचे आगामी भिडे संमेलनाबाबत माहिती देऊन संमेलनाला आवर्जून उपस्थित रहावे असे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांनी सांगितले. या प्रकाशन समारंभ प्रसंगी श्री. अजय, विजय (ठाणे) तसेच कार्याध्यक्ष व सेक्रेटरी अनुक्रमे श्री. चंद्रकांत व श्री. यशवंतराव भिडे आणि उपाध्यक्ष सर्वश्री कुमार भिडे व मुकुंदराव भिडे तसेच पुण्याहून श्री. विनायक व प्रभाकर भिडे आवर्जून उपस्थित होते.



**संपादक**

# ऑक्टोबर ते डिसेंबर २०१२ पर्यंतची देणगीदारांची यादी

१) श्री. रवींद्र भास्कर भिडे, ठाणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. २,०००/-
२) श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -रु. १,०००/- देणगी
३) श्री. शरदचंद्र विनायक भिडे, मुंबई - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- आजीव सभासद
४) शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -रु. १००/- देणगी
५) श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -रु. ९००/- आजीव सभासद
६) श्री. श्रीहरि त्रिंबक भिडे, ठाणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ५०१/- देणगी
७) श्री. अरूण एस्. भिडे, ठाणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ५००/- देणगी
८) श्री. यशवंतराव भ. भिडे, ठाणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/-
९) श्री. सुभाष वामन भिडे, मुंबई - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -रु. १,१००/- देणगी
१०) श्री. सुभाष वामन भिडे, मुंबई - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ९००/- आजीव सभासद
११) सौ. ज्योत्स्ना शरद भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- आजीव सभासद
१२) श्री. राजेश शरद भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- आजीव सभासद
१३) श्री. योगेश शरद भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- आजीव सभासद
१४) श्री. मिलिंद पु. भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -रु. ५,०००/- देणगी
१५) श्री. माधव पु. भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- देणगी
१६) श्री. सिद्धेश्वर बाळकृष्ण भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १०,०००/- देणगी
१७) श्री. विद्याधर गंगाधर भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ९००/- आजीव सभासद
१८) श्री. विद्याधर गंगाधर भिडे, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १,०००/- देणगी
१९) शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १००१/- देणगी

# राजस स्नेह

सौ. प्रिया सुनील भिडे



सातारा, डोंगरांच्या कुशीत बसलेलं इतिहासाची समृद्ध परंपरा लाभलेलं चिमुकलं गाव. माझं आजोळ !

एकोणीसशे तीस-चाळीसच्या दशकातले प्रख्यात कॉन्ट्रॅक्टर कै. गोपाळराव कान्हेरे माझे आजोबा, तर कै. सुशीलाबाई कान्हेरे माझी आजी. अनेक सामाजिक कार्यात अर्ध्या शतकाहून अधिक काळ तिने योगदान दिले. सदुसष्ट साली भूकंपाच्या वेळी स्वत:च्या बांगड्या मदत कार्यास दिल्या तर युद्धकाळी जवानांसाठी खूप मदत गोळा केली. सातारा महिला मंडळ, बाल विकास मंडळ यासाठी खूप वर्ष निरपेक्ष काम केलं.

सातारा म्हटलं की आठवतात बालपणचे सोनेरी दिवस. भलं मोठं घर, आवार, झाडावर बसून खाल्लेले पेरू अन् चिक्कू, घरच्या आमराईतले ट्रकनी काढलेले आंबे अन् घरभर पसरलेली आढी. आजीच्या हातचा आंब्याचा गोळा. दिवाळीतले किल्ले अन् बिझिकचा डाव ! बालपण सरत गेलं तसं जाणवत गेलं की सातारला एक आगळं-वेगळं श्रीमंत, राजस मायेचं छायाछत्र होतं. ते म्हणजे कै. श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले. जगासाठी त्या मॉंसाहेब होत्या. आम्ही त्यांना 'राणी आजी' म्हणत असू. त्यांचा व माझ्या आजीचा फार-फार स्नेह होता. तेव्हाच्या काळी काही मोजक्या घरी त्या जात असत त्यात माझ्या आजीचं घर होतं. माझी आई सौ. नलिनी नगरकर हिच्यावर त्यांनी मुलीसारखे प्रेम केले. आम्ही अदालतवाड्यावर गेलो की आमचेही त्या खूप लाड करत. मला आठवतं, कधी हातरुमाल जरी विसरलो तरी पुढच्या वेळी तो इस्त्री करून परत मिळे. आमच्या वाढदिवसाला आवर्जून भेटकार्ड पाठवीत असत. छोट्या छोट्या गोष्टींमधून मॉंसाहेबांचे मोठेपण समजत गेले. त्यांच्या आचरणातून आम्हाला जीवनाचे धडे मिळत गेले हे आमचे भाग्य.

माझे वडील नाशिकला रीसर्च इन्स्टिट्यूटमध्ये डायरेक्टर होते. नाशिक तीर्थक्षेत्र असल्याने श्रावण महिन्यात मॉंसाहेब आमच्या घरी वास्तव्यास येत. आमच्यासाठी हा काळ म्हणजे एक पर्वणीच असे. श्री काळाराम मंदिर व त्र्यंबकेश्वर येथे जायला त्यांना आवडत असे. आम्ही त्यांच्या बरोबर वेरूळ, घृष्णेश्वर येथेही गेलो होतो. माझ्या आई-वडिलांकडून त्यांनी घृष्णेश्वराची पूजा बांधली होती. मॉंसाहेब येणार म्हटल्यावर आमचे ड्रायव्हर त्यांची ड्यूटी मिळावी म्हणून आईकडे आग्रह धरीत. त्याही सर्वांची ममतेने विचारपूस करीत. अंगणातल्या झोपाळ्यावर बसून त्या आम्हाला त्यांच्या लहानपणच्या धारच्या गोष्टी सांगत. मृदू लाघवी बोलणे हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांची शांत वत्सल मूर्ती आजही डोळ्यासमोर उभी राहते.

माझे लग्न झाल्यावर जंगली महाराज रोडला आमच्या घरी त्या येत असत. जेवणानंतर त्यांना चॉकलेट खायला आवडत असे. इडली व आईस्क्रीमही खूप आवडे. श्री. सुनील भिडे यांनी भागीदारीत सुरू केलेल्या 'हॉटेल सम्राट'चे उद्‌घाटनही मॉंसाहेबांनी केले.

कै. श्री. राजमाता सुमित्राराजे भोसले, माझी आजी व माझी आई यांचा स्नेह शब्दात लिहिता येणार नाही. ते पूर्वजन्मीचे ऋणानुबंध होते, अद्वैत होते. तीन पिढ्यांचे स्नेह, नाती कशी जपायची हे राणीआजींनी आम्हाला शिकविले. आम्हाला त्यांचा सहवास लाभला हे आमचे भाग्यच. त्यांच्या आठवणी, त्यांची पत्रे, त्यांनी दिलेल्या वस्तू अमूल्य आहेत. त्यांच्या राजस स्मृती आमचा समृद्ध वारसा आहे. आजही मॉंसाहेबांच्या आठवणीने डोळे झरू लागतात.

सातारचं दैवत कै. छ. राजमाता सुमित्राराजे भोसले यांना भिडे कुटुंबियांतर्फे मानाचा मुजरा !

फोन : २५६७४३३४

# ‘‘वयसा किशोर कोमला ।’’

मुले म्हणजे देवाघरची फुले ! फुलांप्रमाणे हळूवार हातांनी माता त्यांना वाढविते. त्यांची शारीरिक आणि मानसिक वाढ निकोप होण्यासाठी खूप कष्ट घेते, अक्षरश: झिजते, हाताचा पाळणा करून बाळाची दुखणी काढते. रात्र रात्र जागरणे करते आणि बाळाचे संरक्षण करते. त्यामुळे लहान मुलांना माता म्हणजे सर्वकाही असे वाटते. पंडित कवी मोरोपंतांनी म्हटले आहे ‘माता ब्रह्मचि शिशुपणी, पौगंडी खेळ’ म्हणजेच पाच वर्षापर्यंत मुलांना आई म्हणजे सर्वकाही ब्रह्मरूप असे वाटते. नंतर मात्र त्यांचे लक्ष थोडेसे आजूबाजूला जाऊ लागते, त्यांची धडपडण्याची प्रवृत्ती वाढू लागते. सारखे काहीतरी उद्योग करावेसे वाटतात. त्यांची धडपडण्याची प्रवृत्ती म्हणजे खेळता खेळता मोड, तोड, फोड करणे, उड्या मारणे, झाडावर चढणे, पडणे, रडणे इ. किशोरावस्थेत बालकाला सर्वात प्रिय असतो तो खेळ. खेळात रमलेले बालक तहानभूक विसरते मग आईलाच त्याला बोलावून जेवूखाऊ घालावे लागते. अशी खेळात रमणारी मुले सहा ते बारा या गटात येतात. समवयस्क मुले एकत्र येऊन रंगून विटीदांडू, चेंडू, कबड्डी वगैरे खेळ खेळतात, मग कुणाला जखमा होतात, कुणाच्या काचा फुटतात. अशा वेळी मोठी माणसे म्हणतात, ‘भंडावलं बाई या पोरांनी’ आता यांना कुठेतरी गुंतवली पाहिजेत. या वेळी आठवण होते ती गवळणींच्या खोड्या करणाऱ्या गोपालकृष्णाची आणि त्यांच्या सवंगड्यांची. अशा क्रीडावृत्तीचा विकास होण्यासाठी यशोदेने कृष्णाला गायी सांभाळायला वृंदावनात पाठवले. त्याच्यावर जबाबदारी टाकली. त्यामुळे त्याने गोपाळांची संघटना केली, त्यांचे नेतृत्व केले. त्यांच्यावर मनापासून प्रेम केले आणि त्यांना आपलेसे करून घेतले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा आद्य प्रणेता भगवान गोपालकृष्णच ! भविष्यकाळात त्याने अद्‌भुत् पराक्रम केला. कालिया सारख्या दुष्ट नागाला व कंस चाणूरादि राक्षसांना ठार मारले. प्रजाहितकारी न्यायाचे राज्य स्थापन केले. मुलांचा असा उत्तम प्रकारचा विकास होण्यासाठी त्यांना मातापित्याकडून प्रेम संरक्षण आणि प्रतिष्ठा हवी असते. किशोरावस्था ही मानसिक आणि शारीरिक स्थैर्याची असते. सातव्या वर्षापर्यंत पचनेंद्रियांची पूर्ण वाढ झालेली असते तशीच मेंदूचीही वाढ पूर्ण झालेली असते. सर्व अवयवांचे चलनवलन सुकर झालेले असते. या काळात किशोरांचे आरोग्य समाधानकारक असते. शैशवात अज्ञात जगाविषयी वाटणारे आश्चर्य आणि भय नाहीसे झालेले असते, आत्मविश्वास वाटत असतो.

शैशवातील आत्मकेंद्रित म्हणजे स्वत:चाच विचार करण्याची प्रवृत्ती किशोरात आढळून येत नाही. त्यांची वृत्ती बाह्यलक्षी असते. बाह्यसृष्टीविषयी त्यांना कुतूहल असते. प्राण्यांची आणि झाडांची नावे ते विचारतात. फुलांची उत्पत्ती कशी होते, दूध कसे काढतात, स्टोव्ह कसा चालतो, विमान कसे उडते इत्यादी गोष्टी त्यांना जाणून घ्यावयाच्या असतात. या वयात ते गुरुजी, आई-वडील, मित्र यांना प्रश्न विचारून भंडावून सोडतात. पालकांनीही न कंटाळता त्यांना योग्य ते उत्तर द्यावे. या कुतूहला पोटी कधीकधी वस्तूंची मोडतोडही केली जाते पण यावेळी पालकांनीही धाकदपटशाने कुतूहल दाबून न टाकता मुलांना पटेल अशी शास्त्रोक्त माहिती द्यावी व मोडतोड न करण्याविषयी त्यांची समजूत घालावी. या कुतूहल बुद्धीमुळे मुलांना वाचनाची आवड लागते. त्यांना योग्य असे बालवाङ्मय वाचायला देऊन त्यांची वाचनाची आवड वाढवावी. याच वयात युद्धप्रवृत्ती, संग्रह प्रवृत्ती आणि विधायक प्रवृत्ती या तीन प्रवृत्ती आकार घेत असतात. किशोर बालकांमध्ये नेहमी मारामाऱ्या, भांडणे होत असतात. यावेळी भांडखोर मुलास संघाचे नेतृत्व दिले तर त्याच्या भांडखोरपणाला विधायक रूप प्राप्त होऊ शकते, भांडण सोडून तो आपल्या संघातील सर्व मुलांना सांभाळून घेतो.

दुसरी म्हणजे संग्राहक प्रवृत्ती. यामुळे अनेक उपयुक्त व टाकाऊ वस्तूंचा संग्रह मुले करीत असतात. उदा. काचेचे तुकडे, पेन्सिली, गोट्या, पक्ष्यांची पिसे, पोस्टाची तिकिटे वगैरे. ही त्यांची आवडही पालक आणि शिक्षक यांनी जतन करावी. कारण त्यांची स्वामित्वाची भावना यामुळे जपली जाते. तिसरी प्रवृत्ती ही विधायक प्रवृत्ती. या प्रवृत्तीमुळे वाळूचे किल्ले, शाडू मातीची चित्रे, पुठ्ठ्याची घरे, कागदाची फुले बनविणे इत्यादी रचनात्मक छंद लागतात. यात भावी विकासाचा पाया असतो. हीच मुले पुढे यंत्रज्ञ-तंत्रज्ञ होऊन देशाच्या विकास कार्यात हातभार लावणार असतात. त्यांची संघप्रवृत्ती हळू हळू बळकट होत असते. शालेय जीवनात सांघिक कार्यक्रमाचे महत्त्व फार असते. विविध कला क्रीडांमध्येच नव्हे तर अभ्यासातही संघभावनेलास्थान देता येईल. वर्गाचे गट पाडून हुषार मुलांकडून कमी बुद्धिवान मुलांना मदत मिळेल अशी योजना आखली तर संघ भावनेला समाज हितपर वळण लागेल व व्यक्ती जीवनाची परिपूर्तता समाजाचे कल्याण करण्यात आहे ही जाणीव विद्यार्थी दशेतच निर्माण होऊन आदर्श समाजसेवक, देशसेवक निर्माण होतील यात शंका नाही.

अनुकरण करणे हा किशोरांचा स्वभाव असतो. वडीलधाऱ्या माणसांचे व्यवसाय असतील त्याप्रमाणे यांचे खेळ सुरू असतात. म्हणून पालकांनी व शिक्षकांनी स्वत: उत्तम आचार विचारांचे वर्तन ठेऊन मुलांपुढे आदर्श ठेवावा. मुलांचे शील त्यांच्या अनुकरण प्रवृत्तीतून घडत असते याची जाणा ठेऊन त्यांच्यावर थोडी थोडी जबाबदारी टाकावी, त्यांची कामे त्यांनाच करू द्यावीत. म्हणजे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. या सर्व गोष्टींचा विचार करून पालकांनी, शिक्षकांनी त्यांच्या प्रवृत्तीला योग्य वळण लावले तर ही किशोरवयीन मुले चारित्र्यसंपन्न, निकोप, देशाचे मजबूत आधारस्तंभ होतील व ‘कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ।’ हे आपले स्वप्न साकार होईल.

**डॉ. सौ. वसुधा भिडे**
**‘निष्ठा’, ४२, ओंकारेश्वर सोसायटी,**
**सहकारनगर क्र. १, पुणे - ४११ ००९**

# हार्दिक अभिनंदन !
# भिडे प्रतिष्ठान विद्यार्थी गुणगौरव योजना २०१२-१३

**गट १ ला - चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश**



**१) तनया मुकुंद भिडे.** इ. ४थी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २६६ गुण, अभिनव बालक मंदिर, विश्रामबाग सांगली.



**२) चिन्मयी योगेश भिडे.** इ. ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २७२ गुण, वसंत विहार हायस्कूल, पोखरण रोड, ठाणे.



**३) राधिका प्रसाद भिडे.** इ. ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे विभागामध्ये १३ वी

**गट ३ रा - १० वी शालांत परीक्षेत ८०% पेक्षा जास्त गुण**



**१) कु. देविका शंतनू भिडे,** पुणे विभागीय मंडळ (९८.३६% गुण)



**२) कु. श्रेया राजेन्द्र भिडे,** पुणे विभागीय मंडळ (९६.५५% गुण)



**३) कु. परितोष राजेश भिडे,** पुणे विभागीय मंडळ (९६.४०% गुण)

**गट ४ था - १० वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी** (कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ श्रीमती प्रियंवदा भिडे, प्रभादेवी, मुंबई, पुरस्कृत)

**१) कु. देविका शंतनू भिडे,** पुणे - ९८.३६% गुण, पुणे विभागीय मंडळ

**गट ५ वा - १२ वी परीक्षेत सर्वाधिक गुण.**

(कै. दादुकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ, डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली पुरस्कृत)

**१) कौशिक धनंजय भिडे,** पुणे ९१.१७% गुण, पुणे विभागीय मंडळ

**गट ६वा - १२ वी परीक्षेत शास्त्र शाखेत ८०% पेक्षा अधिक गुण**

**१) कौशिक धनंजय भिडे,** पुणे विभागीय मंडळ, ९१.१७% गुण

**२) अद्वैत सुहासचंद्र भिडे** - पुणे (८१.५०% गुण) पुणे विभागीय मंडळ

**गट ७ वा - १० वी शालांत परीक्षा मराठी विषय सर्वाधिक गुण**

(कै. सिंधु विनायक भिडे स्मरणार्थ) श्री. बळवंत दत्तात्रय भिडे - अमळनेर पुरस्कृत)

**१) कु. श्रेया राजेंद्र भिडे** - मराठीत १०० पैकी ९० गुण

**गट ८ वा - १० वी शालांत परीक्षा संस्कृत विषय सर्वाधिक गुण**

(श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई, पुरस्कृत)

**१)चि. परितोष राजेश भिडे,** संस्कृत मध्ये १०० पैकी १०० गुण


**गट ९ वा - १० वी शालांत परीक्षेत इंग्रजी विषय सर्वाधिक गुण**

कै. दत्तात्रय विनायक भिडे, अमळनेर यांचे स्मरणार्थ) त्यांची कन्या सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत.

**१) चि. परितोष राजेश भिडे**- इंग्रजी विषयात १०० पैकी ९२ गुण

**गट १० वा - विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थी**

१) महाराष्ट्रीय कलोपासक पुणे तर्फे पुरुषोत्तम करंडक २०१२ च्या आंतर महाविद्यालयीन नाट्य स्पर्धेत उत्तेजनार्थ अभिनयाचे रमा-पुरुषोत्तम अनंत कृष्णाजी पारितोषिक मिळविल्याबद्दल **''एक शुभ कथा''** या एकांकिकेत **''लेखक''** या भूमिकेबद्दल पुरस्कार **चि. पुष्कराज राजेन्द्र भिडे (मराठवाडा मित्रमंडळ अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे)**



**२) अद्वैत सुहासचंद्र भिडे** (१२ वी उत्तीर्ण, अभियांत्रिकी विद्यालय, पुणे) आर्चरी ज्युनियर स्टेट मेरिट सर्टिफिकिट, आर्चरी ज्युनियर नॅशनल सर्टिफिकेट

**३) मानसी सुहासचंद्र भिडे,**(कमिन्स इंजि. कॉलेज, पुणे) शिवछत्रपती पुरस्कार, २२ व्या महा. राज्य रोलर स्केटिंग चँपियनशिप स्पर्धेत १६ वर्षा वरील मुलींच्या गटात ब्रॉंझ आणि रौप्य पदक.

**डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे**
**(प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना)**

# ऋषितुल्य

**१) सिद्धेश्वर बाळकृष्ण भिडे - वय ७७ वर्षे**



निवेंडी कुलातील आहेत. खामगांव (जि. बुलढाणा) येथे ४ डिसेंबर १९३५ रोजी जन्म. जमखिंडी येथे मॅट्रिक पर्यंत शिक्षण. शालेय जीवनात रिंग टेनिसमध्ये प्राविण्य मिळविले. डिस्क थ्रो, भालाफेक सारख्या मैदानी खेळात विशेष आवड आहे. किर्लोस्कर न्यूमॅटिक कं. हडपसर या कंपनीमधून १९९० साली सेक्शन मॅनेजर म्हणून निवृत्त.

**२) सौ. मालती द. पेंडसे - वय ७७ वर्षे पूर्ण**




(पूर्वाश्रमीच्या कु. सुशीला परशुराम भिडे) १९६० साली लग्न होऊन पेंडसे झाल्या. मूळच्या ठाणे येथील रहिवासी. मॅट्रिक पास झाल्यानंतर १९५६ साली PTC परीक्षा पास होऊन त्यावेळच्या बॉम्बे म्युनिसिपल शाळा, चुनाभट्टी येथे एकूण ३६ वर्षे नोकरी. डेप्युटी शिक्षक म्हणून १० वर्षे काम केले. मुंबई व्यतिरिक्त बदली नको म्हणून मुख्याध्यापक पद सुद्धा नाकारले. तीन अपत्ये आहेत. एक मुलगा आणि मुली विवाहित आहेत.

**३) सौ. ज्योत्स्ना शरद भिडे - वय ७५ वर्षे पूर्ण**




विलेपार्ले, मुंबई येथील श्री. रा. बा. केतकर यांच्या कन्या आणि पुणे जिल्हा रा. स्व. संघ चालक श्री. हरि कृष्ण भिडे यांच्या स्नुषा. लग्नानंतर बी. ए. ची पदवी, तसेच टि.म.वि. च्या भारतीय विद्या शाखेमध्ये एम. ए. ची पदवी संपादन केली. राष्ट्रीय सेविका समिती मध्ये सक्रीय सहभाग. कै. ताई आपटे महिला विकास प्रतिष्ठानच्या प्रमुख विश्वस्त म्हणून काम पाहतात. प्रवासाची विशेष आवड असून पूर्वोत्तर राज्ये वगळता संपूर्ण भारतात प्रवास करून पुरातत्व विषयी अभ्यास केला. ठाणे येथील विश्रामगड प्रवासी बांधवांचा अभ्यास करून 'वनवासी विश्रामगडचे' या ग्रंथाची निर्मिती केली.

**४) श्रीमती सुमती वसंत भिडे, वय ७९ वर्षे पूर्ण**



संवादिनी उत्तम वाजवितात तसेच गाण्याची आवड आहे. पुण्यामधील बलभीम मंदिरात भजनास संवादिनीची साथ करतात.

**५) सौ. सुहासिनी पुरुषोत्तम भिडे - वय ७५ वर्षे पूर्ण**




पूर्वाश्रमीच्या कु. कुसुम रामचंद्र जोशी. १९५९ साली लग्न होऊन भिडे झाल्या. मॅट्रिक पर्यंत रेणुका स्वरूप, पुणे येथे शिक्षण पूर्ण केले. लग्नानंतर बी. ए. झाल्या. त्यांना वाचन व भरतकाम, शिवणकामाची आवड आहे. ३२ वर्षांपूर्वी एका डोळ्याची व ७ वर्षांपूर्वी दुसऱ्या डोळ्याची दृष्टी गेली तरीसुद्धा घरातील सर्व कामे करण्याचा प्रयत्न करतात.

**६) श्रीमती निर्मला श्रीपाद भिडे - ७७ वर्षे पूर्ण**



पूर्वाश्रमीच्या भिकुबाई रामचंद्र भिडे. वयाच्या १३ व्या वर्षीच लग्न होऊन भिडे झाल्या. शिक्षण ७ वी असून प्रवासाची आवड आहे. ईशान्य भारत वगळता संपूर्ण भारत दर्शन झालेले आहे. त्या मूळच्या कोकणातील बीरवाड, महाड येथील असून चिपळूण जवळच्या पोफळी गावामध्ये झालेल्या कॅरम स्पर्धेत बक्षिसेही मिळविली आहेत.

**७) श्री. श्रीपाद नारायण भिडे, सातारा - वय ८० वर्षे पूर्ण**



मॅट्रिक पास. ३८ वर्षे वन खात्यात नोकरी. वाचन व लिखाणाचा छंद असल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर धार्मिक लेख, कथा लिहीत आहेत. त्यांच्या मेघवर्षांची दुसरी आवृत्ती, रहस्यमय तरुणी आणि संगीता, वेगळी नजर या कादंबऱ्या नुकत्याच प्रसिद्ध झाल्या या व्यतिरिक्त दिवाळी अंकासाठी लिखाण करतात. मायेची ऊब या उपक्रमाद्वारे सेवाकार्य करतात. त्यांच्या पत्नी सुमनताईंच्या यशोधन वधु-वर संस्थेमध्ये काम करण्यास सहकार्य करतात.

**८) श्री. दत्तात्रय दामोदर भिडे - वय वर्षे ८१ पूर्ण**

मॅट्रिक पर्यंत शिक्षण, कूपर इंजिनियरिंग सातारा येथे नोकरी. कुस्तीगीर व हाड वैद्य म्हणून वयाचे ८० पर्यंत व्यवसाय केला.

**९) श्री. सदानंद काशिनाथ भिडे - वय ८१ पूर्ण**



लिंब गोवा सातारा, शिक्षण मॅट्रिक पास, जिल्हा परिषदमध्ये प्राथमिक शिक्षक. नंतर मुख्याध्यापक म्हणून निवृत्त. संजीवन चिकित्सेचा अभ्यास करून खेड्यातील लोकांना औषधोपचार केले. लोणावळा येथील मन:शक्ती संस्थेचे काम करतात. योगासन स्पर्धेमध्ये सहभागी होतात.

# पुरस्कार २०१२-१३

## कला पुरस्कार २०१२-१३

## सौ. पूर्णिमा मुकुंद भिडे.

(श्री. कुमार आणि वसंत भिडे, सांगली. पुरस्कृत, त्यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)



कोणत्याही कलेचे शिक्षण अथवा पदवी संपादन केलेली नसतानासुद्धा लहानपणापासून चित्रकलेची आवड असणाऱ्या व केवळ हौसेपोटी आणि उपजत असलेले कलागुण जतन करणाऱ्या सांगलीच्या **सौ. पूर्णिमा मुकुंद भिडे.** यांनी आपल्या कुंचल्यातून अंदमानातील जीवन आणि निसर्गावरील अनेक चित्रे साकारली आहेत. अंदमान हे प्रवाळ बेट असल्यामुळे भूकंप, ज्वालामुखी व त्सुनामीमुळे वस्ती विरळ आहे. या बेटांवर हल्ले झाले तरीसुद्धा तेथे जारवा, सेंटेनॅटल, अंदमानी, निकोबारी इ. आदिवासी मात्र अजूनही वस्ती करून आहेत. हे प्रसंग डोळ्यासमोर हुबेहूब उभे राहतील अशा अप्रतिम कलाकृती त्यांनी आपल्या कुंचल्यातून जिवंत केल्या आहेत. ''अंदमान एक चित्र प्रवास'' या नावाने २००५ मध्ये सर्वप्रथम सांगली येथे, २००६ मध्ये पुणे, २००९ मध्ये मिरज, २०१० मध्ये पुन्हा सांगली आणि २०११ व १२ मध्ये पुणे या ठिकाणी त्यांच्या चित्रकृतींचे प्रदर्शन भरविले होते. त्याला उत्कृष्ठ प्रतिसादही मिळाला.

सौ. पूर्णिमा भिडे यांचा जन्म विजापूर येथे झाला. मे. भिडे ऑटो स्टोअर्स, सांगली या दुकानाचे मालक श्री. मुकुंदराव यांच्या त्या सहचारिणी आहेत. या कलेबरोबरच ब्राह्मण महिला मंडळाच्या माजी अध्यक्षा, ॲक्टिव्ह ग्रुप व संस्कार भारती या संस्थांमध्ये त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सातारा येथील भिडे संमेलनातसुद्धा त्यांनी आपल्या कलाकृती सादर केल्या आहेत.

सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून आपल्या कलेचा उपयोग समाजाकरिता व्हावा आणि तसा वेळ देणे हे माझे उत्तरदायित्व आहे असे त्या सांगतात. या वर्षीचा कला पुरस्कार त्यांना देऊन आम्ही सन्मानित करीत आहोत. त्यांच्या या चित्रकृती भविष्यात अशाच बहरत राहो ही सदिच्छा !

## क्रीडा पुरस्कार - २०१३

## कु. देविका शंतनू भिडे

बालवयापासून उपजत असलेली खेळाची आवड, निरीक्षण, जिद्द आणि चिकाटी अशी सर्वगुण संपन्न असलेली आणि टेबलटेनीस खेळामध्ये सतत चमकदार कामगिरी करणारी **कु. देविका शंतनु भिडे** हिची २०१२-१३ च्या क्रीडा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. सातारा येथे दि. १२ व १३ जानेवारी २०१३ रोजी होणाऱ्या भिडे संमेलनात हा पुरस्कार तिला प्रदान करण्यात येईल.



देविकाचे वय फक्त १६ वर्षे असून सुद्धा तिने अनेक पदके व पुरस्कार मिळविले आहेत. ती जशी खेळामध्ये चमकदार कामगिरी करते तशीच तिची शैक्षणिक कामगिरीसुद्धा वाखाणण्यासारखी आहे. २०१२ मध्ये तिला १० वी च्या परीक्षेत ९८ टक्के गुण मिळविले आहेत. आता सध्या ती फर्ग्युसन कॉलेज मध्ये शास्त्र शाखेत ११वी मध्ये शिकत आहे.

देविकाने ५ वी पासून टेनिस खेळण्यास प्रारंभ केला, त्यापूर्वी तिने जिम्नॅस्टिक आणि लंगडी स्पर्धेत शाळेला सांघिक विजेतेपद सलग दोन वर्षे मिळवून दिले. तिला अनेक पुरस्कार व पदके मिळाली आहेत. त्यापैकी काही विशेष पदके व पुरस्कार खाली नमूद केले आहेत.

१) १२ वर्षाखालील गटात महाराष्ट्रात अव्वल स्थानावर. तसेच २ वर्षे महाराष्ट्राची कप्तान.

२) १५ वर्षाखालील गटात सलग ३ वर्षे महाराष्ट्रात दोन नंबरच्या स्थानावर.

३) १७ वर्षाखालील गटात सध्या महाराष्ट्रात दोन नंबरवर. तसेच २०१२ मध्ये २ सुवर्ण, २ रौप्य व २ कांस्य पदके.

४) अलीबाग येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सुवर्णपदक व कॉलेजला ट्रॉफी व संघकप्तान.

५) २०११ पासून एअर इंडियाची स्कॉलरशिप व १७ वर्षाखालील मुलींच्या गटाची एअर इंडियाची कप्तान.

देविकाच्या या यशामध्ये तिचे वडील श्री. शंतनू व आई वृषाली यांचे सहकार्य लाभत असते. अतिशय उत्साहाने दोघेही तिला प्रोत्साहन देत असतात. खचित आपला व्यवसाय किंवा घरातील इतर कामे बाजूला ठेवून तिच्या खेळात लक्ष घालतात. एखाद्या कुशल नर्तकीच्या पायात ताल, सतार वादकाच्या सतारीत नाद आणि वीणेत जसे कोमल सूर असतात तसे टेबलटेनीस खेळताना देविकामध्ये विद्युल्लतेचे चापल्य दिसून येते.




## उद्योजक पुरस्कार - २०१३
## श्रीमती सुषमा शशिकांत भिडे


(श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली. पुरस्कृत, त्यांचे वडील कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

सातारा फॅब्रिकेशन जगतात नाव लौकिक मिळालेली इंडस्ट्री म्हणजे 'सुनील इंडस्ट्री'. श्री. शशिकांत भिडे यांनी गेली २५ वर्षे अथक परिश्रम करून नाव कमावले. कामाची उत्तम गुणवत्ता चोख व्यवहार व मनमिळावू स्वभाव यामुळे अल्पावधीतच ते लोकप्रीय झाले. लोक त्यांना 'दादा भिडे' या नावाने ओळखत. पुणे, सातारा, कोकण व मध्य प्रदेश इ. ठिकाणी त्यांनी आपल्या कामाचा पाया भक्कम केला. पण २००८ साली दादा भिडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले व प्रगतीला खीळ बसली. तरीही न डगमगता सुषमा खंबीरपणे उभी राहिली. विशेष म्हणजे या व्यवसायातील काहीही माहिती व शिक्षण नसताना फॅक्टरीतील वर्कर्सच्या मदतीने तिने या व्यवसायाची धुरा समर्थपणे सांभाळली. तिचा मुलगा प्रतिक तेव्हा शिकत होता. पण सुषमानी त्याला पण या व्यवसायाची गोडी लावली. प्रतीकने पण अल्पावधीतच या कामामधे तरबेज झाला व मार्केटिंगची जबाबदारी सांभाळू लागला. आता प्रतिक व सुषमा दोघे मिळून फॅक्टरी उत्तमरित्या सांभळत आहेत. त्यांची पण पुणे, वाई, कऱ्हाड, सातारा अशा अनेक ठिकाणी कामे चालू आहेत. हे सर्व चालू करण्या अगोदर सुषमाच्या मनात फॅक्टरी भाड्याने चालवायला द्यावी असा विचार आला होता. पण केवळ प्रतिकच्या आग्रहाखातर या माय-लेकांनी फॅक्टरी सुरूच ठेवायचा निर्णय घेतला तो अचूक ठरला. या दोघांना त्यांच्या व्यवसायाकरिता व पुढील आयुष्यासाठी भिडे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक शुभेच्छा !


---

# बोडणाची रांगोळी





बोडणाची
रांगोळी
सर्व भिडे
बांधवांच्या
माहितीसाठी
पुन्हा देत
आहोत.



प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल कबीर RNI No. M-6 (1457)/70-RNI
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## प्रत्येक सौंदर्यवान स्त्रीचं 'पवित्रिका' मध्ये स्वागत

जीवनाचा रसरसून आनंद घेणाऱ्या, 'सुख-दु:खे समे कृत्वा' या तत्वावर
जीवन जगत सुखाचा आनंदाने स्वीकार करून, आणि संकटांना सामर्थ्याने
भिडणाऱ्या, कुठल्याही परिस्थितीत न डगमगणाऱ्या भिडे भगिनी व भिड्यांच्या
माहेर वाशिणींना **पवित्रिकाचा** मानाचा मुजरा ! भिड्यांच्याच वास्तूत
**पवित्रिकाचे** दालन, हा एक सुखद योगायोग ! भिडे परिवार आणि
**पवित्रिकाचे** असे जिव्हाळ्याचे संबंध ! म्हणूनच, सौंदर्यवान आणि
सामर्थ्यशाली भिडे भगिनींचे आणि भिड्यांच्या माहेर वाशिणींचे
**पवित्रिकामध्ये** मन:पूर्वक स्वागत ! सुंदर, अस्सल रेशमी साड्या,
बनारसी शालू, पैठणी, संपूर्ण लग्नबस्ता, तसेच खास सिल्क आणि
कॉटन नऊवारी साड्या व फक्त पारंपारिक साड्यांसाठी
पुण्यनगरीतील नवेकोरे आलिशान वस्त्रदालन, म्हणजे **पवित्रिका क्रिएशन** !
भिडे भगिनींच्या सौंदर्यावर रेशमी वस्त्रांचं कोंदण !

**" भिडे भगिनींच्या सौंदर्यावर प्राजक्त फुलणार...**
**पवित्रिकामधली साडी नेसून, त्यांचे रूप अधिकच खुलणार !**

# पवित्रिका
## क्रिएशन

१, बुधवार पेठ, १ ला मजला, भिडे वाडा, तुळशीबाग लेन,
विश्रामबाग वाड्यासमोर, बाजीराव रोड, पुणे - ०२, फोन ०२० २४४३०२०४

॥ जय श्री माताजी ॥

आमच्या कुशल कारागीरांचे अथक प्रयत्न, कौशल्य, निष्ठा व आम्हा सर्वांचे एकत्रित प्रयत्न व अनुभव यांच्या बळावर आम्ही आपणास वेळोवेळी जास्तीत जास्त कलात्मक, आकर्षक व सुन्दर साड्या गेल्या 76 वर्षां पासुन आपल्या साठीच सादर करीत आहोत.

आम्ही

श्री®
महालक्ष्मी
वस्त्र भांडार
1935

इन्दौरी, महेश्वरी, चंदेरी, पैठणी,
कोसा सिल्क
कांजीवरम, बोमकाई,
बनारसी शालू, प्योर सिल्क,
व सर्व वैवाहिक
साड्यांचे अधिकृत विक्रेता

७६
वर्ष पूर्ण

प्रोप्रायटर:
सुरेन्द्र भिडे

फोन : 0731-2535071,
मोबाईल : 98260-40308,
98266-40308



मुख्य शोरूम :
30-32, जेल रोड, इन्दौर (म.प्र.)
ब्रांच : महेश्वर (म.प्र.)
website : shreemahalaxmisarees.com